शुक्रवार, २३ डिसेंबर २०२२
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१२७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 23 DECEMBER 2022
adhunikkesari.com Adhunik Kesari
YEAR-02 • ISSUE-127 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-08 • PRICE-5



# लिंगायत समाजाचा महामोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव : ओबीसी अंतर्गत 15 टक्के आरक्षणाचा लाभ आपल्या समाजाला मिळावा, यासाठी लिंगायत पंचमसाली समाजाच्या वतीने गुरुवारी मोर्चा काढण्यात आला. लिंगायत पंचमसाली समाजाला सध्या 5 टक्के आरक्षणाचा लाभ मिळत आहे. बेळगावातील विधानसौध या ठिकाणी हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात आपल्या मागण्या मान्य करण्यात याव्यात, यासाठी लिंगायत पंचमसाली समाजाने मोर्चा काढला.**

कुडल संगम येथील श्री श्री मृत्युंजय स्वामी यांच्या नेतृत्वाखाली लाखो बांधव मोर्चात सहभागी झाले. पंचमसालीना आरक्षण मिळालेच पाहिजे, हर हर महादेव अशा घोषणा मोर्चात सहभागी झालेल्यांनी दिल्या. पंचमसाली लिगायत समाज हा वीरशैव लिंगायत समाजाचा एक उपसमुदाय मानला जातो. ओबीसी अंतर्गत 15 टक्के आरक्षणाचा लाभ समाजाला मिळावा यासाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. जर मुख्यमंत्री बसवराज बोम्मईंनी लिंगायत पंचमसाली समाजाला आरक्षण दिले तर त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणार असल्याचे श्री श्री मृत्युंजय स्वामी यांनी म्हटले. लिंगायत पंचमसाली समाज हा भाजपचा पारंपरिक मतदार आहे. भाजप नेत्यांची या समाजावर पकड आहे. लिंगायत पंचमसाली समाजाच्या आरक्षणाची मागणी जुनी आहे. गेल्या अनेक वर्षापासून या समाजाला ओबीसी अंतर्गत 2A मध्ये समाविष्ठ करावे, अशी मागणी केली जात आहे.

## महत्वाची बातमी

# प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे निलंबन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील



यांचे निलंबन करण्यात आल्यानंतर महाविकास आघाडी आक्रमक झाली आहे. विधानसभा अध्यक्षांना उद्देशून अपशब्द वापरल्यामुळे जयंत पाटील यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत जयंत पाटील यांचे निलंबन असणार आहे. यानंतर जयंत पाटील यांनी ट्वीट केले असून सरकारवर ताशेरे ओढले आहेत. जयंत पाटील यांनी ट्वीट केले असून या निर्लज्ज सरकारविरोधात लढत राहणार असे म्हटले आहे. या निर्लज्ज सरकारविरोधात लढत राहणार. बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज की जय, असे ट्वीट जयंत पाटील यांनी केले आहे. विधानसभेमध्ये दिशा सालियान मृत्यू प्रकरणावर चर्चा झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाकडून अनेक दावे करण्यात आले होते. यादरम्यान झालेल्या गोंधळामुळे ६ वेळा कामकाज तहकूब करण्यात आले. त्यानंतर कामकाज सुरू होताच विरोधी पक्षांकडून आमदार भास्कर जाधव यांना बोलू देण्याची विनंती करण्यात आली.

# आमदार मुक्ता टिळक यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कसबा विधानसभा मतदारसंघातील भाजपा



आमदार, माजी महापौर मुक्ता टिळक यांचे गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती शैलेश, मुलगा कुणाल आणि मुलगी चैताली असा परिवार आहे. मुक्ता टिळक गेल्या काही दिवसांपासून कर्करोगाने आजारी होत्या. त्यांच्यावर पुण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उद्या सकाळी ९ ते ११ या वेळेत केसरीवाडा येथील राहत्या घरी पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. वैकुंठ स्मशामभुमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले होते. महापालिकेच्या इतिहासात भाजपाची प्रथमच सत्ता आल्यानंतर भाजपाच्या पहिल्या महापौर होण्याचा मान मुक्ता टिळक यांना मिळाला होता. अडीच वर्षे त्या महापौर होत्या. नगरसेवक असतानाच त्यांनी २०१९ मध्ये कसबा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली. कसबा विधानसभा मतदारसंघातून त्या विजयी झाल्या होत्या. मुक्ता टिळक यांचा राजकीय प्रवास नगरसेविका म्हणून सुरू झाला होता. त्या चारवेळा नगरसेविका होत्या. भाजपातही त्यांनी विविध पदे भूषविली. गेल्या काही महिन्यांपासून त्या कर्करोग या असाध्य आजाराने ग्रस्त होत्या. दुर्धर आजाराने ग्रस्त असतानाही त्यांनी राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुकीत रुग्णवाहिकेतून मुंबईत जाऊन मदत केली होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनीही त्यांच्या या पक्षनिष्ठेचे कौतुक केले होते.

# राहुल शेवाळेंच्या अडचणी वाढणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अभिनेता सुशांतसिंह राजपूत मृत्यू प्रकरणाचा मुद्दा खासदार राहुल शेवाळे यांनी काल लोकसभेत उपस्थित केला होता. यावेळी त्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. यावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. याचे पडसाद आज विधिमंडळातदेखील बघायला मिळाले. दरम्यान, खासदार राहुल शेवाळे यांच्यावर एका महिलेने बलात्काराचे आरोप केले असून या प्रकरणाची एसआयटी चौकशी व्हावी, अशी ठाकरे गटाच्या नेत्या मनिषा कायंदे यांनी विधानपरिषदेत केली. या मागणीची दखल घेत विधानपरिषदेच्या सभापती निलम गोऱ्हे यांनी राहुल शेवाळे यांची एसआयटी चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. खासदार राहुल शेवाळे यांनी सुशांतसिंह प्रकरणावरून आदित्य ठाकरेंवर आरोप केल्यानंतर ठाकरे गटदेखील आक्रमक झाला आहे. शेवाळेंना प्रत्युत्तर देण्यासाठी ठाकरे गटाने राहुल शेवाळेंवरील बलात्काराच्या आरोपाचा मुद्दा आज विधानपरिषेदत उपस्थित केला. या मुद्यावरून आज विधानपरिषदेत गरारोळ झाल्याचेही बघायला मिळाले. यावेळी शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या मनिषा कायंदे यांनी राहुल शेवाळे यांची एसआयटी चौकशी करावी, अशी मागणी केली. खासदार राहुल शेवाळे यांच्याबद्दल महिलेने गंभीर तक्रार केली आहे. तिच्यावर बलात्कार झाल्याचे आणि तिला मारपीठ झाल्याचे आरोप तिने केले आहेत. याबाबत तिने मुंबई पोलिसांकडे रितसर तक्रारदेखील दाखल केली आहे. तसेच त्या महिलनेने पंतप्रधान कार्यालय आणि राष्ट्रीय महिला आयोगाकडेही तक्रार केली आहे. तिच्या जिवाला धोका असल्याचेही तिने म्हटले आहे. मात्र, मुंबईचे पोलीस आयुक्त तिच्या तक्रारीला दाद देत नाहीत. त्या महिलेवर प्रचंड दबाव आहे. तिला मुंबईला येऊन पोलीस आयुक्तांना भेटायचे आहे. मात्र, तिला इथे येऊ दिले जात नाही. त्यामुळे याप्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी, असे त्या म्हणाल्या.

# बोलक्या भिंती



जी-20 देशांच्या परिषदेचे अध्यक्षपद यंदा भारताकडे आले असल्याने सर्वच देशांचे प्रतिनिधी औरंगाबाद येथील हॉटेल ताजमध्ये मुक्कामी असणार आहेत. या अनुषंगाने शहरातील मुख्य रस्त्यांवरील भिंती आकर्षक रंगरंगोटींनी सजविल्या जात आहेत, त्याचेच ही बोलकी छायाचित्रे...!!
*छायाचित्र : संदीप मानकर*

# औरंगाबादेत रविवारी महास्वच्छता अभियान

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी




तसेच शहर स्वच्छतेसाठी जनजागृती निर्माण करण्याकरिता डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाणच्या वतिने औरंगाबाद शहर, छावणी परिषद तसेच वाळूज औद्योगिक व नागरी वसाहतीमध्ये येत्या रविवारी दि.२५ डिसेंबर रोजी महास्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. या महास्वच्छता अभियानात राज्यातील कानाकोपऱ्यातून सदस्य येणार आहे. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतिने कोरोना संकटापूर्वी २०१९ मध्ये आशा प्रकारचे महा स्वच्छता अभियान शहरात राबविण्यात आले होते. यावेळी प्रतिष्ठानच्या सदस्यांसह लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी, प्रतिष्ठीत नागरिकांसह सर्वसामन्य नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला होता. हे कोरोना संकट दुर झाल्यानंतर आता पुन्हा एकदा येत्या रविवारी दि. २५ डिसेंबर रोजी महानगरपालिका, छावणी परिषद तसेच वाळूज औद्योगिक व नागरी वसाहतीतमध्ये राबविण्यात येणार आहे. या महास्वच्छता अभियानाला रविवारी सकाळी ७.३० वाजता क्रांतीचौक येथून शुभारंभ होणार आहे. या महास्वच्छता अभियानात सर्वच क्षेत्रातील जवळपास ५० ते ५५ हजार नागरिक सदस्य सहभागी होणार आहे. जिल्ह्यातील तसेच शहरातील कानाकोपऱ्यातून या महास्वच्छता अभियानात सदस्य फावडे (खोरे), टोपले, झाडू यासह इतर साहित्य घेऊन सदस्य हजर राहणार आहे. या महास्वच्छता अभियानाचा समारोप सकाळी ११ वाजता छावणीमधील आयकर भवन कार्यालयाच्या पाठीमागील मोकळ्या मैदानावर करण्यात येणार आहे.


**या जिल्ह्यातून सदस्य होणार दाखल**

रविवारी होणाऱ्या या महास्वच्छता अभियानासाठी राज्यातील अनेक जिल्ह्यांमधून डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानाचे सदस्य सहभागी होणार आहे . यात जालना, बीड, उस्मानाबाद ( धाराशिव ), तुळजापूर, सोलापूर, बुलढाणा, जळगाव, भुसावळ, जामनेर, रावेर, अहमदनगर, नाशिक, पंढरपूर, लातूर आदी ठिकाणाहुन सदस्य दाखल होणार आहेत .

**अशी आहे पार्किंग व्यवस्था**

या महास्वच्छता अभियानासाठी येणाऱ्या सदस्यांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था त्या त्या मार्गावर करण्यात आली आहे . पंचवटी चौकातील कर्णपुरा मैदान, आरटीओ कार्यालयासमोरील आयोध्यानगरी मैदान, गरवारे स्टेडिअम, हर्सूल परिसरातील मैदान यासह त्यात्या मार्गावरील मोकळ्या जागेत पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे .







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# शाश्वत समाधानाचे मुक्त विद्यापीठ : ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

आधुनिक केसरी

घ्या किंवा रामनाम घेता घेता आपले काम करा हे त्यांचे सांगणे होते. त्यांची शिकवण साधी सोपी होती. सर्वांसाठी होती. व्यावहारिक जीवनातले अनेक दाखले देऊन महाराज आपले म्हणणे पटवून देत. त्यांचे बोलणे जरी साधे सोपे असले तरी त्यांचे वागणे, बोलणे, त्यांचे व्यक्तिमत्व आणि चेहऱ्यावरील विलक्षण तेज या सगळ्या गोष्टींचा लोकांवर प्रभाव पडत असे. महाराजांचे बोल लोकांच्या हृदयाचा ठाव घेत असत. त्याचे आणखीही एक कारण होते. ते म्हणजे महाराजांचे वागणे हा ' बोले तैसा चाले ' याचा उत्तम वस्तुपाठ होता. पोकळ उपदेश करणाऱ्याचे बोलणे लोकांवर फार प्रभाव टाकू शकत नाही. ' आधी केले मग सांगितले ' असे महाराजांचे वागणे होते. नाम घ्यायलाच महाराज का सांगत ? तर ते म्हणतात, ' नाम हा जीव आणि शिव यांच्यातील दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम हे सगुण आणि निर्गुण दोन्ही आहे. नाम म्हणजे सत्संगाचा पाया आणि कळसही आहे. महाराजांच्या प्रत्येक वाक्यात जीवनाची खरीखुरी अनुभूती भरून राहिलेली असे. वेदांतातील कठीण तत्वज्ञान महाराजांच्या



मुखातून येताना सोप्या शब्दांचे रूप धारण करून येई. ते म्हणायचे, ' जग काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव प्रपंच, तर भगवंत काय म्हणेल याचे भान ठेवून वागणे म्हणजे परमार्थ. जो कधी चुकतो आणि कधी बरोबर येतो तो साधक, आणि ज्याची दृष्टी रामरूप झाली तो गुरु. ज्याचे हवेपण जास्त तो गरीब, आणि ज्याचे हवेपण कमी तो श्रीमंत. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती तर विषयांची आवड म्हणजे प्रपंच. ' महाराजांच्या मनीध्यानी सतत भगवंत असल्यामुळे त्यांचे बोलणे अगदी आतून आलेले, भक्तीने ओथंबलेले आणि मनावर ठसणारे असे. त्यांची साधी सोपी वाक्ये म्हणजे परमार्थातील सूत्रे बनत. संत कोणाला म्हणावे असा प्रश्न आपल्यासारख्या सामान्य व्यक्तीला पडतो. महाराज त्याचे फार सुंदर उत्तर देतात. ते म्हणतात, ' संत ओळखण्याची अगदी सोपी खूण म्हणजे ज्याच्या सहवासात आपले मन समाधान पावते व अकारण मनाला प्रसन्नता येते तो संत असला पाहिजे. ' स्तोत्र म्हणणे म्हणजे पत्राने भगवंताची भेट घेण्यासारखे आहे, तर नाम घेणे हे भगवंताला प्रत्यक्ष भेटण्यासारखे आहे. महाराजांना एका व्यक्तीने एकदा विचारले की महाराज तुम्ही पाहिलेला जीवनातील सर्वात मोठा चमत्कार कोणता ? महाराजांनी मोठे छान उत्तर दिले. **क्रमश;**



## आनंदी पहाट

# ग्लॅमरच्या आकर्षणामुळे व्यवसायवृद्धी शक्य

आधुनिक केसरी

सौंदर्य संस्कृतीची व्याख्या ही जीवनशैली, उत्पादने आणि सौंदर्याशी संबंधित लोक, शारीरिक लकबी आणि सौंदर्यशास्त्र यावर केंद्रित आहे. सौंदर्य संस्कृतीचे उदाहरण म्हणजे सुपर मॉडेल्सवर केंद्रित केलेले लक्ष आणि सौंदर्याच्या रूढीवादी कल्पनेचा विकास होय. सौंदर्याची आपली धारणा सांस्कृतिक प्रभाव आणि सौंदर्यशास्त्राच्या



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कल्पनांद्वारे प्रत्येक काळातील फॅशन निर्धारित केली जाते. आपल्या सौंदर्याच्या कल्पनांमध्ये संस्कृती देखील मोठी भूमिका बजावत असते. "तारुण्य" हे अमेरिकेतील सौंदर्याचे ध्येय असल्याचे दिसून येते, तर नैसर्गिकरित्या निर्दोष त्वचा हे युरोपमधील सौंदर्याचे आदर्श मानले जाते. आपल्या जीवनात सौंदर्य वाढवणे आणि ते टिकवून ठेवणे हे दोन्ही ही खूप महत्वाचे असल्याचे समजले जाते. ते प्रत्येकाला आपापल्या खऱ्या स्वभावाशी आणि आपल्या निर्मात्याशी जुळवून घेते. ते आपल्या अंतरात्म्याला शांत, आनंदी करते आणि उत्साह वाढवते. स्त्री सौंदर्याच्या आदर्शाच्या बाबतीत हा सामाजिकदृष्ट्या तयार केलेला समज आहे की, "शारीरिक आकर्षकता ही महिलांची सर्वात महत्वाची सौदर्याच्या दृष्टीने मोठी बाब आहे आणि सर्व स्त्रियांनी ते साध्य करण्यासाठी आणि टिकवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत". कॉस्मेटोलॉजी हा कोर्स विद्यार्थ्यांनी ब्यूटी थेरपीच्या मूलभूत गोष्टींबद्दल जाणून घेण्यासाठी, त्यांचे पालन करण्यासाठी, कामाच्या ठिकाणी स्वच्छता आणि सुरक्षितता राखण्यासाठी डिझाइन केलेला आहे. विद्यार्थ्यांना विविध सौंदर्य उत्पादनांविषयी ज्ञान प्राप्त होउन मूलभूत तत्वे तसेच वैविध्यपूर्ण कार्य जसे मॅनीक्योर, पेडीक्योर, हेअरस्टाईल, चेहऱ्याची काळजी घेण्यासाठी निरनिराळ्या सेवासुविधा ते आत्मसात करू शकतात. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त सौंदर्यशिक्षणाचे विविध अभ्यासक्रम लहान-मोठ्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून प्रात्यक्षिक कार्यानुभावावर भर देऊन चालवले जातात.



आधुनिक केसरी

**तुझी कृपा छाया| लाभो मज ||**

माझ्या मना गा रे | विठुचे भजन ||
कर्माचे पुजन | जडो देहा ||१||
सगुणाची भक्ती | निर्गुणाचा भाव ||
अद्वैताचा ठाव | ज्ञाना दावी ||२||
विकारांची बाधा | नको माझ्या जीवा ||
मौनाचा ओलावा | प्रसादु रे ||३||
इंद्रियाचे सुख | फुकाचा पसारा ||
आत्म्याचा निवारा | नाम तुझे ||४||
मागणे न काही | आता विठुराया ||
तुझी कृपा छाया | लाभो मज ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## विनवणी

आधुनिक केसरी

**तुझ्या स्मरणाचे वेड लागावे, मी न कुणा कधी काही मागावे, दातार मज तूच एक असावे याचनेचे शब्द ओठी नसावे. जगदंबे तुझे नाम ओठी असावे, चित्तात तुझे पादपद्म असावे डोळ्यापुढे रूप तुझे विलसावे, जिकडे पहावे तिकडे तू दिसावे. वात्सल्यसरिते प्रेमभरिते अंबे कृपादान देई चन्द्रहासे रेणुके, सिंहारूढे एकवीरे जगदंबे, नमन माझे नित्य तुला अंबिके**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

इंद्रियांना दिसणारा नामरूपांचा देखावा मुळात तात्पुरता भ्रम आहे. नामरूपाच्या पलीकडे असणारे ब्रम्ह रूपरहस्य साक्षात्कारी पुरूषच जाणतात. ज्याप्रमाणे आकाशात ढग आल्यावर ढगांचे आवरण दिसते ते कायम स्वरूपाचे नसतात त्याप्रमाणे शुध्दब्रम्हाच्या मायेच्या करामतीने विश्वाचे अवडंबर आढळते. ते मिथ्या वाटते. अशा रीतीने माया अशाश्वत असून ब्रम्ह मात्र शाश्वत आहे. ते सर्व ठिकाणी सदैव भरून राहिले आहे. खरं म्हणजे सर्व इंद्रियांना ब्रम्ह आतबाहेर व्यापून आहे. ब्रम्हामध्येच सर्व इंद्रिये आप आपली कार्ये करत असतात. असे जरी असले तरी इंद्रियांनी ते जाणण्याचा प्रयत्न केला तर इंद्रियांचा हव्यास मोडून पडतो. ब्रम्ह अतींद्रिय असल्याने इंद्रियांची गति तेथे खुंटते. ब्रम्ह अतिसूक्ष्म आहे त्याचा अनुभव येण्यास आपल्या मध्ये फरक होणे आवश्यक असते आपली ज्ञानाची कक्षा रूंदावत गेली की ज्ञानचक्षु अत्यंत सूक्ष्म झाला की ब्रम्हाचा अनुभव येतो. प्रथम हे सारे द्रुष्य



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


विश्व मनातून नाहीसे झाले पाहिजे. आपल्या देहासकट सर्व स्रुष्टि सत्य नाहीच अशी खात्री झाली म्हणजे ब्रम्हाचा अनुभव घेण्याची पात्रता अंगी येते. त्यानंतर ब्रम्हाचा स्वतः ला साक्षात्कार होतो व जीव ब्रम्ह रूप होऊन जातो. ज्ञानद्रुष्टी सुक्ष्म असते तर इंद्रियद्र्युष्टी स्थूल असते. अर्थात ज्ञानद्रुष्टीने जे ब्रम्हस्वरूप जाणतो ते इंद्रियांना जाणणे शक्य नसते. अंतरंगात ते बरोबर समजते. ब्रम्ह ज्ञान स्वतः प्रमाण असते. म्हणून इंद्रियप्रचीति सतेज आहे किंवा नाही हे ज्याचे त्याला अंतरंगात बरोबर समजते. जाग्रुति,स्वप्न व सुषुप्ति या तीन अज्ञानाच्या अवस्था आहेत. चौथी अवस्था तुर्या ,या अवस्थेत एकीकडे ब्रम्हाचे भान असते तल दुसरीकडे द्रुष्य विश्वाचे भान असते. स्वरूपानुभव येण्यास व्रुत्ति कुठे ठेवावी हे तुर्येमध्ये बरोबर समजते. ती सर्व साक्षिणी अवस्था आहे. देहासकट सर्व द्रयुष्य विश्वाला तुर्येमध्ये वेगळे पणाने पहाता येते. "मी आत्मा सर्व द्रुष्याचा अतीत आहे, मी केवळ त्याचा साक्षी आहे" अशी अवस्था असली तरी तिच्यामध्ये साक्षित्वाची सुक्ष्म शक्ति असते,साक्षित्व मावळून ती व्रुत्ती सुध्दा विलीन झाली म्हणजे उन्मनी प्राप्त होते. संपूर्ण व्रुत्तिरहित अवस्था म्हणजे उन्मनी होय. त्या निवृत्ती अवस्थेत सर्व जाणतेपण विरते,तेच विज्ञान होय. प्रथम अज्ञान नाहीसे होऊन । ज्ञान उदय पावते.पुढे ज्ञान नाहींसे होऊन विज्ञान येते. अखेर विज्ञान देखील ब्रम्हात एकरूप होते,मग केवळ शुद्ध व विमलब्रम्ह परब्रम्ह तेवढे शिल्लक उरते. असे हे शाश्वत ब्रम्ह आहे.

# उत्कट भावनेने भगवंताची उपासना करावी

आधुनिक केसरी

विस्तव माहीत नसला, तरी तो हाताला चुकूनही लागला तरी हात भाजतो; किंवा हा परीस आहे हे माहीत नसूनही, लोखंडाचा घण त्यावर मारला तरी त्याचे सोने व्हायचे रहात नाही. त्याप्रमाणे ज्ञानाशिवाय नुसते भक्तीने जरी भगवंताकडे गेले तरी काम होते. परंतु दुसऱ्या विषयांची आसक्ति जोवर आपल्याला सुटत नाही, तोवर मनापासून भगवद्भक्ति होत नाही. जिथे उत्कट भावना आहे तिथे सगुण मूर्तीला मनुष्यधर्म प्राप्त होतील. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्तीमध्ये त्याला जिवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. शिवाय, जे इतर लोक थोडे तन्मय झाले आहेत, त्यांनादेखील तो अनुभवाला येईल. परंतु उपासकाची किंवा भक्ताची भावना नेहमी उत्कट राहीलच असा नेम नाही. म्हणून अशा उपासकाला मूर्तीमधल्या चैतन्याचा अनुभव येऊन देखील पारमार्थिकदृष्ट्या फायदा होईलच असे निश्चित नाही.

एका मुलाने काही खोडी केली म्हणून शेजारच्या बाईने त्याला एक चापट मारली. त्याबरोबर त्या मुलाने मोठे भोकाड पसरले आणि त्या बाईला शिव्या देऊ लागला. ते ऐकून त्याची आई बाहेर आली आणि तिने त्याला चांगलाच झोडपला. परंतु आईच्या हातचा इतका मार खाऊनसुद्धा



तो मुलगा फार ओरडला नाही, आणि त्याने आईला उलट शिव्यापण दिल्या नाहीत. हे जसे खरे, त्याप्रमाणे आपल्यावर येणारी संकटे ही भगवंताने आणली आहेत अशी निष्ठा असेल, तर आपल्याला त्यांचा त्रास होईल, पण त्यांनी आपली शांति बिघडणार नाही. भगवंताचा विसर आपल्याला पडला की आपली शांति बिघडते. ज्या दातांनी सिंह मोठाले प्राणी मारतो त्याच दातांनी तो आपल्या पिल्लांना इजा न करता उचलतो, हे लक्षात असू द्यावे. आपण निःपक्षपाती बुद्धीने विचार केला तर भगवंताचे सान्निध्य लाभले त्यालाच निर्भयता आणि निर्वासनता येईल. प्रत्येक माणसाला आधार लागतो. पण आपण अपूर्णाचा आधार धरल्यामुळे आपल्याला निर्भयता येत नाही; यासाठी भगवंताचा आधार धरावा. बुद्धीने निश्चय करावा आणि मन भगवंताकडे लावावे, की इंद्रिये तिकडे बळजबरीने जातीलच, राम उपाधिरहित आणि त्याचे नामही उपाधिरहित आहे. म्हणून, ज्याप्रमाणे खडक किंवा वाळू पाण्याशी मिसळत नाहीत, साखर किंवा मीठच विरघळते आणि समरस होते, तद्वत् रामाशी त्याचे नामच समरस होते. **आजचे बोधवचन आहे** –सर्व सृष्टी रामरूप दिसणे हेच भक्तीचे फळ आहे.

# आ.फारुख शाह यांच्या नेतृत्वाखाली विधिमंडळावर भव्य मोर्चा

## जातीचे दाखले व वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अडचणी



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्रात छप्परबंद, शाह व फकीर समाजाला विमुक्त जातीचे दाखले व वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मुस्लीम शाह समाज संघटनेच्यावतीने आ फारूख शाह यांच्या नेतृत्वाखाली विधिमंडळावर मोर्चा आयोजित करण्यात आलेला होता. मोर्चाची सुरुवात यशवंत स्टेडीयम येथून करण्यात येवून समारोप विधीमंडळावर करण्यात आला. आ.फारुख शाह यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांची भेट घेवून छप्परबंद, शाह व फकीर समाजाला विमुक्त जातीचे दाखले व वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणींबाबत निवेदन देवून चर्चा केली. एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात तत्काळ कार्यवाही करणेबाबत अभिवचन दिले. मोर्चामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातून हजारो छप्परबंद, शाह व फकीर समाजाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांना देण्यात आलेल्या निवेदनाचा आशय पुढीलप्रमाणे आ. शाह छप्परबंद समाजाचे एकमेव आमदार असून ते शाह छप्परबंद समाजाला जातीचे दाखले व वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी सुमारे १५ वर्षापासून लढा देत आहेत. संपुर्ण महाराष्ट्रात शाह समाज अत्यंत गरीब असून आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्यांच्या मागासपणा दूर व्हावा व शैक्षणिकदृष्ट्या समाज सक्षम व्हावा या दृष्टीने शासनाने १९७८ साली विमुक्त जातीच्या यादीत १४ व्या क्र. छप्परबंद (मुस्लीम धर्मीयासह) या जातीचा समावेश केला. परंतु त्यावेळेस सुद्धा छप्परबंद कोण ? यावरून अनेक प्रश्न निर्माण झाले समाजाने यासर्व बाबींची पूर्तता केली व शेवटी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाच्या आदेश व निर्देशानुसार कास्ट व्हेरिफिकेशन कमिटी पुणे यांनी आपल्या दि.०८/०४/१९९४ रोजी झालेल्या सभेत सर्व बाबींचा न्यायालयीन सूचना शिफारशीच्या व इतर ऐतिहासिक पुस्तके तसेच भारतीय संस्कृती कोषातील पुरावे तसेच मागविण्यात आलेली माहीती,मुलाखतीद्वारे सर्व मुद्द्यांचे सर्वांकश विचार करून व आपले पुर्ण समाधानानंतर असे स्पष्ट निर्णय दिला की जे मुस्लीम धर्मीय आहे व आपल्या नावापुढे किवा मागे "शाह" शब्दप्रयोग करतात ते छप्परबंद आहेत व त्यांना छप्परबंद (विमुक्त जातीचे) दाखले व वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. काही अधिकाऱ्यांकडून अडचणी निर्माण केल्या जातात व वेळोवेळी शासनाकडे तक्रार केल्यावर शासनाने वेळोवेळी परिपत्रके काढुन त्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. ५ जानेवारी १९९९, २४ डिसेंबर २००२, २९ जून २००६ तसेच मा.उच्च न्यायालय नागपुर खंडपीठाच्या आदेशानुसार २३ मार्च २०११ रोजी परिपत्रक काढुन स्पष्ट आदेशित केले आहे की ज्या व्यक्तीच्या नावापुढे किवा मागे शाह हा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. व त्यांच्या वाड-वडीलांच्या नोंदीमध्ये फकीरची नोंद करण्यात आलेली आहे. त्या व्यक्तीस छप्परबंद जातीचा समजण्यात यावे व त्यांना छप्परबंद (विमुक्त जातीचे) दाखले व वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे.सन २०११ साली मा.उच्च न्यायालय खंडपीठाच्या आदेशानुसार २९ जून २००६ च्या पत्रकात सुधारणा करून शासनातर्फे २३ मार्च २०११ चे नवीन परिपत्रक काढण्यात आले. परंतु २३ मार्च २०११ चे परिपत्रक सुद्धा २०१५ साली शासनातर्फे रद्द करण्यात आले. सदर परिपत्रक रद्द केल्यानंतर शासनाने सुधारीत परिपत्रक किवा शासन निर्णय काढणे गरजेचे होते. असे झाले असते तर सदर समाजास जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र काढतांना आज ज्या अडचणी येत आहेत त्या आल्या नसत्या काही अधिकारी आमच्याकडून छप्परबंद या शब्दाची नोंद मागतात. परंतु आपणास विनंती करण्यात येते की छप्परबंद हा शब्द सांकेतिक असून ते अपमान जनक असल्यामुळे जातीच्या रकान्यात नोंद करण्यासारखा नाही म्हणून आमच्या पूर्वजांनी तशी छप्परबंदची नोंद केलेली नाही मा.उच्च न्यायालय नागपुर खंडपीठाने वेळोवेळी दिलेले आदेश पुणे कास्ट व्हेरिफिकेशन कमिटी ने दिलेला निर्णय तसेच शासनाने वेळोवेळी काढलेल्या परिपत्रकानुसार छप्परबंदची व्याख्या स्पष्ट होते की ज्या व्यक्तीच्या नावापुढे किवा मागे शाह शब्दाचा प्रयोग करण्यात आलेला आहे व ज्यांच्या पुर्वजांच्या नोंदीमध्ये फकीरची नोंद आढळते त्या व्यक्तीला छप्परबंद जातीचे समजण्यात यावे यासाठी मोठ्या संख्येने मोर्चा काढण्यात आला.



# परळीची भार्गवी कराड कांस्यपदकाची मानकरी

## राष्ट्रीय रोलिंग स्केटिंग स्पर्धेत देशात मिळविला तिसरा क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** रोलीग स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्यावतीने कर्नाटक राज्यातील बेंगलोर येथे नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील स्केटींग स्पर्धा संपन्न झाली. त्यात चौदा वर्षे वयोगटात औरंगाबाद येथील ज्ञानदा इंग्लिश मीडिअम स्कूलची विद्यार्थीनी भार्गवी नामदेव कराड हिने कास्यंपदक मिळविले. भार्गवी हिने अतिशय खडतर परिश्रम घेत आपल्या पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळविले. औरंगाबदसारख्या शहरात स्केटिंगबाबत जास्त सुविधा नसतानाही केवळ जिद्द आणि मेहनतीच्या बळावर तिने हे यश मिळविले. या स्पर्धेची तयारी करण्यासाठी भार्गवी महिन्यातून एकदा पुणे येथे जात होती. यात तिला अजय भाटकर व राहुल राणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. वडिल नामदेव कराड व आई सविता कराड यांचाही या यशात मोलाचा वाटा असल्याचे भार्गवीने सांगितले. या यशाबद्दल ज्ञानदा स्कूलचे प्राचार्य ममता मॅडम, विजया मँडम तसेच शाळेतील क्रीडा शिक्षकांनी तिचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# भव्य मोफत मूळव्याध, भगन्दर, फिशर, मूतखडा तपासणी व निदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या शल्यतंत्र विभागातर्फे सोमवार, दि. २६ डिसेंबर २०२२ रोजी हनुमान मंदिर, इटखेडा येथे सकाळी १० ते १ दरम्यान भव्य मोफत मूळव्याध, भगन्दर, फिशर, मूतखडा व न भरणाऱ्या जखमा तपासणी व निदान शिबिराचे आयोजन केले आहे. त्यामधे व्याधिसंदर्भात मार्गदर्शन देखील करण्यात येणार आहे. गुदग़त रक्तस्त्राव, चिरा पडणे, संडासच्या ठिकाणी आग होणे, गुदामार्गातुन मांस अंग बाहेर पड़णे, मलबद्दता या व इतर समस्यांचे तज्ञ वैद्यांकड़ून निराकरण करण्यात येणार आहे. तसेच आवश्यक असल्यास रक्त, लघवीची तपासणी तसेच दुर्बीनद्वारे गुदमार्गाची तपासणी अल्पदरात करुन मिळेल. शिबिरानंतर व्याधींवर आयुर्वेदिक पद्धतीने औषध उपचार उदा. क्षारकर्म, क्षारसूत्र, अग्निकर्म, रक्तमोक्षण, व शस्त्र कर्म चिकित्सा अत्यल्प दरात केल्या जातील. याशिवाय पुन्हा आजार निर्माण न होण्यासाठी आदर्श जीवनशैलीबद्दल तज्ञांकडून मार्गदर्शन मिळेल. या शिबीरासाठी तज्ञ चिकित्सक डॉ. बी. एन.गडवे, डॉ. आर. एन. गुंडरे, डॉ. एस. व्ही मोरे, डॉ. पी. वी. बोचरे, डॉ. ए. ए. सुळकेकर , डॉ. पी. एस. घोरपडे डॉ. पी. एन. तेलंग्रे उपचार आणि मार्गदर्शन करतील. मोफत नावनोंदणीसाठी क्र. ०२४०-२६४६४६४, २३७९२४८, टोल फ्री क्र. १८००२१०१६१७ यावर संपर्क करावा, तरी सर्व गरजू रुग्णांनी रुग्णालयात येवून शिबिराचा पुरेपूर लाभ घ्यावा,असे आवाहन प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. जयश्री देशमुख आणि रुग्णालय अधिक्षक डॉ. नरेश निंबाळकर यांनी केले आहे.

# 'त्या' महिलेचा प्रियकरच निघाला आरोपी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** घरातील पाण्याच्या हौदात २५ वर्षीय विवाहितेचा





मृत्युदेह सापडल्याची घटना सोमवार (दि.१९. डिसेंबर) रोजी वैजापूर तालुक्यातील शिवूर येथे घडली असून याप्रकरणात मृत महिलेच्या मृत्यूप्रकरणी माहेरच्या मंडळींनी सबंधित महिलेच्या सासू व नवऱ्यास जबाबदार मानून पोलिसात गुन्हा दाखल केला होता परंतु संशयित घटनेची तालुकाभरात चर्चा झाल्याने तपास करताना शिवूर पोलीसांनी या प्रकरणात अधिक धागेदोरे हाती लागण्याची शक्यता वर्तवली होती मृत माया दादासाहेब आगलावे (वय २5) हिच्या आई विठाबाई बाळनाथ कराळे यांच्या फिर्यादीवरून मृत महिलेच्या पती दादासाहेब कलिनाथ आगलावे, सासू राधाबाई कलिनाथ आगलावे यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची चौकशी सुरु असताना पोलिसांनी तपास केला असता त्यांच्याच नात्यातील एक व्यक्ती या प्रकरणाचा मुख्य आरोपी असल्याचा संशय बळावला आणि त्या दृष्टीने तपासाची चक्रे फिरवत चोवीस तासाच्या आत बुधवार दि.२१ रोजी ज्ञानेश्वर बबन आगलावे रा.शिऊर यास ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली दरम्यान पोलिसांनी खाकी दाखवताच आरोपी बबन आगलावे याने खुनाची कबुली दिली असून यात माया आगलावे हिच्याशी माझे गेल्या सहा महिन्यापासून अनैतिक संबंध होते त्यामुळे माया हीच्याकडून वारंवार पैशाची मागणी होत होती नेहमीप्रमाणेच मृत माया हिने दि.१९ सोमवार रोजी हिने फोन करून वीस हजाराची मागणी केली व लगेच घरी येण्याची बोलावणी केली असता मी तिच्या घरी गेलो घरी गेल्यानंतर घरात एकटी असलेल्या माया हिने वीस हजाराची गरज असून वीस हजार रुपये दे अन्यथा मी तुझ्यावर अतिप्रसंगाचा गुन्हा दाखल करून समाजात बदनामी करेल अशी धमकी दिली समाजात प्रतिष्ठा खराब होण्याच्या धमकीला घाबरून मी स्वतः माया हीचा गळा दाबून खून केला व खुनाला आत्महत्या दाखविण्याच्या प्रयत्नातून माया ळा बेशुद्ध अवस्थेत घरामागील हौदात टाकून बॉडीची विल्हेवाट लावल्याचा जवाब आरोपी ज्ञानेश्वर आगलावे याने पोलिस तपासात दिला असून विशेष म्हणजे खून केल्यानंतर आपण निर्दोष असल्याचे दाखवत संपूर्ण प्रकरण दाखल होण्याच्या घडामोडीत पोलिस ठाण्यात हजर होता खुनातील मुख्य आरोपी ज्ञानेश्वर आगलावे हाच असल्याने त्यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणी एस. पी. मनीष कळवानिया अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवर सहाय्यक पोलीस अधीक्षक महक स्वामी यांच्या मार्गदर्शनाने सपोनि संदीप पाटील, पोउपनी नागटिळक पोउपनीं पवार, सफो जाधव, पोना भास्कर पैठणकर महिला पोलीस वर्पे यांनी गुन्हाचा तपास करून आरोपीचा शोध लावला.

# ह.भ.प. वसंतराव दोधू पाटील यांना मानाचा ज्येष्ठ वारकरी पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** तालुक्यातील विखरण येथील रहिवाशी असलेले ह.भ.प.वसंतराव पाटील (आबा)यांना मानाचा जेष्ठ वारकरी पुरस्कार नुकताच देण्यात आला. खान्देश वारकरी संप्रदायातील मानाचा खान्देश वारकरी सेवा मंडळ तर्फे आयोजन असलेल्या वै प्रातःस्मरणीय ह.भ.प विठ्ठल बाबा चौधरी (मोठे बाबा) यांच्या पुण्यतिथी निमित्त जेष्ठ वारकरी पुरस्कार नंदुरबार तालुक्यातील विखरण येथील रहिवासी जेष्ठ वारकरी ह.भ.प.वसंतराव पाटील (आबा) यांना नुकताच धुळे येथे मोठ्या दिमाखदार सोहळ्यात पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या शुभ प्रसंगी विखरण व पंचक्रोशीतील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पुरस्काराने ह.भ.प.वसंतराव (आबा)पाटील यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# मुकुंदवाडीत चेन स्नॅचिंग

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मंगळवारी रात्री ८.३०वा. भाजी खरेदी करुन घरी परतणाऱ्या विवाहितेचे पावणे दोन तोळ्याचे १लाख २५ हजारांचे मंगळसूत्र भामट्यांनी मागून येत हिसकावले. वैशाली दिनेश जाजू(४४) रा.दिशानभांगन असे फिर्यादीचे नाव आहे. त्या मुलासोबत काल भाजी खरेदी करुन घरी परतत होत्या.तेवढ्यात त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या चोरट्यांनी १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण हिसकावून पळ काढला. या प्रकरणी मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हेशाखेचे एपीआय मनोज शिंदे यांचे पथक पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचा माग काढत आहेत. पुढील तपास पीएसआय संदीप वाघ करत आहेत.



# चार्ल्स शोभराज

आधुनिक केसरी

बिकिनी किलर म्हणून कुप्रसिद्ध चार्ल्स शोभराजची आज संध्याकाळपर्यंत तुरुंगातून सुटका होण्याची शक्यता आहे. नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी सायंकाळी उशिरा शोभराजची तुरुंगातून सुटका करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या निर्णयाची प्रत तुरुंग प्रशासनापर्यंत पोहोचू न शकल्याने काल रात्री सुटका होऊ शकली नाही. शोभराजचे (चार्ल्स शोभराज) वकील न्यायालयाच्या निर्णयाची लेखी प्रत तुरुंगात पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत जेणेकरून त्याच्या सुटकेची प्रक्रिया सुरू होईल. शोभराजच्या वकील शकुंतला विश्वास यांनी सांगितलं की, आज शोभराजची तुरुंगातून सुटका होऊ शकते. वृद्धापकाळ आणि खालावलेली तब्येत या कारणांमुळे शोभराजच्या सुटकेची मागणी करण्यात आली होती. नेपाळमध्ये दोन परदेशी महिलांच्या हत्येप्रकरणी शोभराजला दोषी ठरवून जन्मठेपेची २० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. १९ वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर नेपाळच्या सुप्रीम कोर्टाने नेपाळच्या तुरुंग नियम आणि कायद्याच्या आधारे शोभराजची सुटका करण्याचे आदेश दिले आहेत. मूळचा व्हियेतनामचा असलेल्या चार्ल्स शोभराजचा जन्म १९४४ मध्ये व्हियेतनामच्या एका शहरात झाला होता. त्याची आई व्हियेतनामची आणि वडील मूळचे भारतीय होते. चार्ल्सने त्याची काही वर्ष आशिया आणि फ्रान्समध्ये घालवली. शोभराजची आई व्हियेतनाममधील आणि वडील एक सिंधी भारतीय होते. मीडिया रिपोर्ट्‌सनुसार, चार्ल्सच्या आई-वडिलांनी लग्न केलं नव्हतं. चार्ल्स लहान असल्यापासून गुन्हेगारीमध्ये आला होता. १९६३ मध्ये चोरीच्या गुन्ह्याखाली त्याला पहिल्यांदा जेलमध्ये जावं लागलं होतं. इथून जेलमधून सुटल्यानंतर चार्ल्स पॅरिसच्या हाय-क्लास सोसायटीमधील लोकांना आपल्या जाळ्यात अडकवू लागला. चार्ल्स पहिल्यांदा झालेल्या जेमधून बाहेर आला, पण त्यानंतरही तो गुन्हेगारीच्या जगात ॲक्टिव्ह होता. फ्रान्समध्ये असाताना त्याने अनेक घोटाळे केले आणि कोट्यवधी रुपये जमा केले. त्यानंतर तो युरोप सोडून इस्तांबूल नंतर भारतात आला. यादरम्यान त्याने सेंटाल नावाच्या एका महिलेशी लग्न केलं होतं. लग्नानंतर दोघं मिळून पर्यटकांना लुटून त्यांच्या पासपोर्ट्‌सवर जगभरत फिरत होते. त्यानंतर मुंबईत राहत असताना त्यांना मुलगी झाली. मुलीच्या जन्मानंतरही तो सतत गुन्हे करत होतो, यादरम्यान तो जेलमधून पळून जाण्यातही माहिर झाला होता.

# चीनला धक्का देण्याची गरज



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**चीन हा साम्राज्यवादी देश आहे. त्याच्या सीमेला लागून असलेल्या विविध शेजारी राष्ट्रांशी त्याचे नेहमीच सीमा विवाद होत असतात. सातत्याने सीमेवर कुरबुरी करून सीमा अशांत ठेवणे व बेसावध राष्ट्रांच्या सीमा गिळंकृत करणे अशा पद्धतीचे चीनचे नेहमीच वर्तन राहिलेले आहे. इंग्रजांच्या काळामध्ये 1914 मध्ये मॅकमोहन नावाच्या अधिकाऱ्याला भारत आणि तिबेट यांच्या दरम्यानची सीमारेषा निश्चित करण्याची जबाबदारी देण्यात आली.**

त्या अधिकाऱ्याचे नाव मॅकमोहन होते म्हणून या सीमारेषेला म्हणतात मॅकमोहन लाईन अथवा मॅकमोहन रेषा. 1950 मध्ये चीन ने तिबेट गिळंकृत केले व तिबेट चीनचा भाग बनला. त्यामुळे मॅकमोहन लाईन ही भारत व तिबेट यांची सीमारेषा, वास्तविकपणे भारत चीन यांची सीमारेषा व्हायला पाहिजे होती. परंतु चीन म्हणतो की भारत त्यावेळेस इंग्रजांचा गुलाम होता व गुलामांना आपल्या सीमा ठरविण्याचा अधिकार नाही. त्यामुळे इंग्रजांनी आखून दिलेली मॅकमोहन रेषा चीन मानत नाही. ही रेषा फक्त कागदावरची रेषा आहे. दोन देशांमध्ये तारेचे कुंपण अथवा सीमा निर्धारित करण्यासारख्या गोष्टी प्रत्यक्षात अस्तित्वात नाही. त्यामुळे अनेक वेळा चीनचे फावते व तो भारतीय हद्दीमध्ये घुसखोरी करतो. घुसखोरी केल्यानंतर सुद्धा ही जागा आमचीच आहे आम्ही कशाला परत जायचे अशा पद्धतीच्या गोष्टी चीन करतो. परंतु गलवान घाटी मध्ये घडलेला जो संघर्ष होता त्या संघर्षामध्ये चीनला हे लक्षात आले की भारतीय सैन्य हे चीनला जशास तसे उत्तर देण्यास सक्षम आहे. तवांग मध्ये सुद्धा चीनने ज्यावेळेला घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला त्या वेळेला भारतीय सैन्यांनी त्यांना बदडून काढले. केंद्र सरकारने सैन्याला दिलेले पूर्ण अधिकार हे त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी सक्षम ठरलेले आहे. म्हणूनच सैन्य योग्य त्या परिस्थितीत योग्य तो निर्णय घेऊ शकते. आजचा भारत हा 1962 चा भारत नाही तर तो 2022 चा संरक्षणक्षम भारत आहे हे चीनच्या वारंवार लक्षात येते आहे.

भारत आणि चीन यांच्या दरम्यान 3488 किलोमीटर लांब इतकी सीमारेषा आहे. ही सीमारेषा जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश या राज्यातून जाते. 1962 च्या युद्धामध्ये चीनने भारताचा 38800 वर्ग किलोमीटर इतका प्रदेश बळकावला.अक्साई चीन हा भारतीय प्रदेश चीनच्या ताब्यात 1962 पासून आहे. भारताने त्यावरचा आपला हक्क सोडलेला नाही. तरीही आज तो भाग चीनच्या ताब्यात आहे. भारताने तो सोडावा यासाठी चीन अरुणाचल प्रदेश वर आपला दावा करीत असतो. दोन्ही देशांमध्ये असलेल्या सीमारेषेला लाईन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल असे म्हणतात. परंतु या रेषेच्या दरम्यान मोठमोठे ग्लेशियर, नद्या, पर्वत आहेत. त्यामुळे सीमारेषा निर्धारित नाही. ही लाईन ऑफ एक्चुअल कंट्रोल पेंगांग स्ते या सरोवरातून जाते. येथूनच एक रस्ता चूशुल घाटीकडे जातो. याच चूशुल घाटी कडून चीनद्वारे 1962 मध्ये आक्रमण केल्या गेले होते. 2020 मध्ये भारत चीन सैन्यांमध्ये मारामारी झाली ती गलवानघाटी अक्साई चीन आणि लदाख यांच्यामध्ये आहे. येथूनच पाकिस्तान सुद्धा जवळ आहे. त्यामुळे गलवानघाटी वर नजर ठेवणे फारच आवश्यक आहे. 1962 च्या युद्धात याच गलवानघाटीचा उपयोग आक्रमणासाठी केला गेला होता. चीनने याच गलवानघाटीच्या प्रदेशात अनेक रस्ते आणि सैनिकांसाठी बंकर तसेच इतर निर्माण कार्य केलेले आहे. व तो आता भारताला म्हणतो की तुम्ही जैसे थे परिस्थिती ठेवा. म्हणजे तुम्ही आता निर्माण कार्य करू नका. 2017 मध्ये चीन नी सिक्कीमच्या व भूतानच्या जवळ असलेल्या डोकलाम येथे रस्ते निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. ज्याला भारताने विरोध केला होता. त्यामुळे डोकलाम चा विवाद हा 70-80 दिवस पर्यंत चालला. व शेवटी चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या व तो समाप्त झाला. डोकलामच्या सीमेवर भारत पर्वतावर आहे तर चीन खाली आहे. त्यामुळे भारतासाठी डोकलाम अतिशय महत्त्वाचे आहे. भूतान आणि बांगलादेश यांच्या मधोमध भारताचा जो भाग आहे त्या निमुळत्या भागाला चिकन नेक असे म्हणतात. चीनने डोकलामला



रस्ता बनविणे म्हणजे भारताच्या चिकननेक या भागासाठी तो एक मोठा धोकाच ठरू शकतो. ज्या तवांगमध्ये भारत चीन यांच्यात संघर्ष झाला तो तवांग आणि तिबेट यांच्यामध्ये सांस्कृतिक समानता खूप मोठ्या प्रमाणावर आहे. तवांग हे बौद्धांच्या करीता एक प्रमुख ठिकाण आहे. तवांगमध्ये मोठ्या प्रमाणावर बौद्ध मठ आहे व तिबेटमध्ये सुद्धा आहेत. त्यामुळे चीनचे लक्ष नेहमी तवांगवर राहिलेले आहे. त्याचे मनसुबे तवांगला ताब्यात घेऊन संपूर्ण बौद्ध मठांवर आपला अधिकार करण्याचे आहे. सिक्कीम आणि दक्षिण तिबेट याच्या मध्ये नाथूला आहे. 1962 च्या युद्धामध्ये चीनने या नाथूला येथून सुद्धा आक्रमण केले होते. या नाथूला भागामध्ये सुद्धा भारत चीन सैन्याचे एकमेकांसोबत संघर्ष होत असतात. त्यामुळे नाथूला असेल, तवांग असेल, डोकलाम असेल किंवा गलवान घाटी असेल अशा विविध सीमांवरून चीन भारतामध्ये घुसखोरी करण्याचे प्रयास सुरू ठेवत असतो.

त्याचा उद्देशच भारताला अस्थिर करीत राहणे हा आहे. की जेणेकरून भारताचे विकासावरचे लक्ष दूर होईल व चीन जगामध्ये प्रथम स्थानी कायम राहील. चीनला जे प्रथम स्थान मिळवायचे आहे ते व्यापारी प्रथम स्थान आहे. आमचे सैन्य सीमेवर चीनला जशास तसे उत्तर देत आहे. परंतु आमच्या सीमांचा भंग करून, आमच्या सैनिकांवर हल्ले चढवून चीन संपूर्ण भारताचा व भारतीय जनतेचा अपमान करीत आहे. त्यामुळे चीनला एक धक्का देण्याची आवश्यकता आहे. तो धक्का आम्ही आमच्या बाजारातून देऊ शकतो. आमच्या बाजारपेठा ज्या चीनी मालानी व्याप्त झालेल्या असतात त्या बाजारपेठांमध्ये 'से नो टू चायना प्रॉडक्ट्स'म्हणजे चायनीज मालाचा संपूर्ण बहिष्कार हे तंत्र जनतेने अमलात आणणे आवश्यक आहे. जेवढा आम्ही चायना चा माल विकत घेऊ तेवढा चीन श्रीमंत होत जाणार आहे. श्रीमंती मुळे येणारा गर्व व मस्ती त्याच्यामध्ये अधिकाधिक वाढणार आहे व त्याचा परिणाम सीमेवर उभ्या असलेल्या आमच्या सैनिकांना धक्के देण्यामध्ये होणार आहे. चीन जर आमच्या सैनिकांना धक्का देत असेल तर आम्ही सुद्धा त्याला व त्याच्या मालाला धक्का देण्याची आवश्यकता आहे.

केवळ कोणत्यातरी संस्थेने अभियान राबवले म्हणून आम्ही चिनीमालाचा बहिष्कार करावा असे नाही तर आमच्या दैनंदिन जीवनामध्ये चायनीज माल आम्ही वापरणार नाही. एकदा नाही व कधीही नाही अशा पद्धतीची प्रतिज्ञा करणे आवश्यक आहे. चीन मध्ये असलेली हुकूमशाही तेथे मानवाधिकारांचे होणारे उल्लंघन, जगाचे प्रदूषण वाढविण्याकरता चीनचा लागणार हातभार, वेगवेगळ्या देशांशी असलेले त्याचे सीमा विवाद याच्यामुळे चीनची प्रतिमा जगामध्ये चांगली नाही. त्यामुळे चीन विविध देशातील कंपन्यांना आपल्या देशामध्ये वस्तू तयार करण्याकरता सोयी सुविधा पुरवितो त्यामुळे जग चीनकडे आकर्षित होते. परंतु चीनचा चेहरा चांगला नसल्यामुळे त्यांना एका दुसऱ्या सुरक्षित भूमीची आवश्यकता आहे. ती भूमी भारत असू शकते. त्यामुळे कोरोना नंतर चीन बद्दल जगामध्ये अधिकच विद्वेष निर्माण झालेला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक कंपन्या चीन सोडून भारतामध्ये आपलं उत्पादन सुरू करू शकतात. यासाठी चीनला नामोहरम करणे आवश्यक आहे. चिनीमालाला जर भारतीय पर्याय उपलब्ध नसेल तर आम्ही चीन व्यतिरिक्त इतर देशांचे पर्याय सुद्धा निवडू शकतो. परंतु चिनी वस्तूचा पर्याय मात्र आम्ही कदापि निवडू नये. भारत आज मोठ्या प्रमाणावर विकसित पावत आहे. येणाऱ्या काळात भारत हा सुद्धा एक मोठी आर्थिक महाशक्ती होणार आहे. ही महाशक्ती भारत बनावा यासाठी भारतीय जनतेने स्वदेशी ची कास धरणे आवश्यक आहे. आमच्या जरुरीच्या सर्वच वस्तू आम्ही स्वदेशी म्हणजे भारतीय बनावटीच्या वापरल्या पाहिजे. ते शक्य नसेल तर ज्या वस्तूंचे उत्पादन भारतात होते त्या वस्तू वापरल्या पाहिजे. तेही शक्य नसेल तर ज्या वस्तू विदेशी आहेत परंतु चायनीज नाही त्या वापरल्या पाहिजे. अशा प्रकारे भारतीय जनतेने एक अभियान चालविण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून चीनला हे समजेल की सीमेवर भारतीय सैनिकाला दिला जाणारा धक्का याचे परिणाम बाजारपेठेमध्ये चीनच्या मालाला बसणार आहेत. यासाठी लोक सहभागाची व लोक चळवळीची आवश्यकता आहे. सीमेवर जवान त्याचे काम करेल परंतु बाजारात आम्ही आपले काम करणे आवश्यक आहे असे वाटते.

# सीमा भागातील गावे मूलभूत सुविधांपासून वंचित



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र -कर्नाटक सीमावादाच्या मुद्दावरून राज्यातील अनेक सीमांचा मुद्दा चर्चेत आला आहे. यामुळे मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आणि गुजरात सगळ्याच सीमांवरच्या गावांना विकासापासून वंचित राहिल्यासारखं वाटतंय . महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याच्या ४० गावांना पाणी मीळत नसल्याने या गावांतील लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असून महाराष्ट्राच्या सीमेवरील ही गावे कर्नाटक राज्यात सामील होण्यास तयार झालेली. या भागातील ग्रामपंचयतीतर्फे अशा प्रकारचा ठराव पारित करून घेतल्याची बातमी देखील वाचण्यात आली. सध्या महाराष्ट्राची चोहोबाजूंनी कोंडी करणे सुरू आहे.**

अक्कलकोट तालुक्यातील पान मंगरूळ, तडवळ, नागणसूर, तोळणूर, करजगी, आळगी, अंकलगी आदी २३ गावे तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्नाटक सीमा आणि भीमा नदीवरच्या पाच गावांमध्ये काही मूठभर तरुणांनी आपली गावे कर्नाटकात विलीन करण्याची मागणी करीत कर्नाटकचा झेंडा फडकवला आहे. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७५ वर्षे उलटूनही महाराष्ट्र सीमेवरील कर्नाटक, तेलंगणा गुजरात व मध्यप्रदेश मधील सिमा भागातील गावात आम्ही प्राथमिक सुविधा देवू शकलो नाही. कर्नाटक व आंध्र सीमालगत असलेली गावे प्राथमिक सुविधापासून वंचित आहेत. शिक्षण,आरोग्य,पाणी, व पायाभूत सुविधां अभावी ही गावे विकासापासून खुप दुर आहेत. यामुळेच सीमेवरील ही गावे शेजारच्या राज्यात सामील होण्यास तयार आहेत. व तशा प्रकारचे ठराव त्या गावातील ग्रामपंचायती करत आहे. देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना सीमाभागातील ही आदिवासी जनता अजूनही मूलभूत समस्यांशी झगडत आहे. राज्य शासन जि. प. सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थाही समस्यांकडे ढुंकून पाहायलाही तयार नाही, अशी भावना मध्य प्रदेश सीमेवर स्थायिक चोपडा तालुक्यातील दुर्गम पाड्यातील आदिवासी बांधवांची आहे. आदिवासी बहुल तालुका असलेल्या चोपड्याच्या उत्तर भागात पर्वत भागातील सातपुडा पर्वतरांग म्हणजे महाराष्ट्र व मध्य प्रदेशाची सीमा आहे. या सीमेवर महाराष्ट्र राज्यातील ३२ आदिवासी गावे, वाड्या-वस्त्या वसलेल्या आहेत. आदिवासी गावे मध्य प्रदेशाची सीमेच्या नजीक आहेत. फक्त मधे अनेर नदी आहे. नदी ओलांडली तर मध्य प्रदेश आहे.नागरी सुविधांपासून वंचितरस्ते, वीज, पाणी, मोबाईल कनेक्टिव्हिटी, शाळा, आरोग्य या सगळ्याच बाबी दुर्लक्षित आहेत. स्वातंत्र्य मिळून साडेसात दशक उलटूनहनही रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, बससेवा अशा मूलभूत सुविधाही अजून काही वाड्या-वस्त्यांवर पोचलेल्या नाहीत.उत्तमनगर, मोरचिडा, सत्रासेन, अमलवाडी, उमर्टी, गौऱ्यापाडा, वैजापूर, कर्जाणे, खाऱ्यापाडाव, मुळ्यावतार, शेंदपाणी यांसह ३२ गावे सातपुडा पर्वतरांगांमध्ये आदिवासी बांधव विखुरलेले आहेत.नदी ओलांडल्यावर नेटवर्कराज्याच्या सीमेत या पाड्यांवर मोबाईल नेटवर्कही मिळत नाही. दोन्ही राज्यांच्या मधली अनेर नदी ओलांडल्याबरोब नेटवर्क मिळते. तंत्रज्ञानाच्या दृष्टीनेही एवढा फरक असल्याचे ग्रामस्थ सांगतात. हेही एसटी पोचलीच नाहीदेश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना अजूनही काही आदिवासी भागातील वाड्या-वस्त्यांत एसटी पोचली नाही. आदिवासींना पायपीट करीत यावे लागते. घोडाचापर, गोमाल, गौऱ्यापाडा यांसह नवाड भागातील आदिवासींपर्यंत एसटी पोचू शकलेली नाही.रस्ते नाहीत, वाट बिकटपक्के रस्ते नाहीत. साधं पायी चालता येत नाही, वाहन कुठून जाणार? शाळेपर्यंत जाण्यास रस्ते नाहीत, दळणवळणाची साधनेही नाहीत. रुग्णवाहिका पोचू शकत नसल्याने गरोदरमाता, स्तनदामाता यांना वेळेवर सेवा मिळत नाहीत. लसीकरणासाठी अनेक अडचणी येतात. नवाड भागात तर रस्तेच नाहीत.पुलाची मागणी धूळखातमहाराष्ट्र व मध्य प्रदेश यांच्या सीमेवर जोडणारा कर्जाणे ते धवलीदरम्यानच्या रस्त्यावर पुलाची मागणी तब्बल १२ वर्षांपासून केली आहे. थेट राष्ट्रपती, मुख्यमंत्री, लोकप्रतिनिधी यांच्याकडे मागणी करूनही अद्याप कारवाई होत नसल्याने प्रस्ताव धूळखात पडून असल्याचे वास्तव समोर आले आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा प्रश्नाचा वाद चिघळलेला असतांनाच सोलापूरमधील काही गावकऱ्यांनी कर्नाटकमध्ये विलीन होण्याची तयारी दर्शविली आहे. गावा- खेड्यांचा विकास न झाल्याने सोलापूरमधील नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. कर्नाटकमध्ये आमचा समावेश करावा, यासाठी थेट ग्रामपंचायतीचे ठराव करण्यात आले आहे. ही सर्व परिस्थिती चर्चेचा विषय असतांना नाशिकमधील काही गावांनीही आम्हाला गुजरातमध्ये विलीन करा, अशी मागणी केली आहे. नाशिक जिल्ह्यातील गावकऱ्यांनी केलेली मागणीवरुन नवा मुद्दा समोर आला आहे. सुरगाणा तालुक्यातील काही गावांनी तहसीलदार सचिन मुळीक यांना निवेदन देत मागणी केली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्यानतंर सुद्धा आजवर मूलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे आम्हालाही गुजरातमध्ये विलीन करा, अशी मागणी केली आहे.सीमा भागात राहणाऱ्या लोकांच्या समस्या आणि वेदना जाणून घेणे खरेतर आवश्यक आहे. पण केवळ राजकीय महत्त्व वाढविण्यासाठी चिथावणीखोर वक्तव्ये केली तर आपलेच नुकसान होणार आहे. आपल्या राज्यातील लोकांना अनेक वर्षे सोयी-सुविधांपासून वंचित ठेवणे हे राजकीय पाप याआधीच्या सत्ताधीशांनी केले असल्याने त्याचे परिणाम आता भोगावयास लागत आहेत. राजकीय एकोपा आणि सौहार्द यामधून या समस्यांवर मात करता येणे शय आहे, पण त्यासाठी सर्वांची तशी मानसिकता हवी.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नाते माणुसकीचे!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**प्रत्येक माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात, त्यांच्या मदतीने आपल्याआयुष्याला कलाटणी मिळते.आपल्या यशात त्या व्यक्तीचा वाटा असतो. याचा मात्र पणाला विसर वाटतो. मी कसा घडलो? याचा अनुभवाचे लेखात कथन यात केले आहे. माझे गाव नांदेड जिल्ह्यातील चिखली (तां कधार )आहे. शिक्षण नांदेड येथे झाले. घरची परिस्थिती अत्यंत हलाख्याची होती. माझ्या 'माय'ने अत्यंत कष्ट करून कुटुंबाला मोठ केलं. मला लिहिण्याचा व वृत्तपत्र वाचण्याचा छंद होता. यातून पहिला लेख 'यांना कोठे महागाई' हा लेख लिहिला होता. तेंव्हा शासकीय कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. कंधार येथे गोविंद यन्नावार, विलास अंबेकर, रमेशसिंह ठाकूर, रमाकांत गायकवाड, बालाजी बनसोडे,बाबू गंजेवार. कांता मामडे, शिवाजी जोशी आदी मित्र मंडळी होती. मला नाटकात काम करण्याची संधी मिळाली. कंधारचे राजकारण जवळून पाहिलेले आहे.**

शे.का पक्षाचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे यांचे तुफानी भाषण, टोलेबाजी, अभूतपूर्व मोर्चे निघालेले पाहिलेत! राज्याच्या विधानसभेत धोंडगे यांची तोफ धडायची. त्यांच्या मोर्चात कधीच हिंसा घडलेली नाही. खर तर! धोंडगेंनी कंधारच्या तरूणांना अन्यायाच्या विरोधात लढण्याचे शिकविले. शे.का पक्षाचे ज्येष्ठ नेते धोंडगे १९५६- १९९५ कंधार विधानसभा सतत निवडून आले. त्यांना कोणीही पराभूत महाराष्ट्रातील ज्येष्ठ काँग्रेस ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाणपासून शंकरराव चव्हाण यांनी प्रयत्न केले पण त्यांचा पराभव करू शकले नाहीत. कंधार च्या "मनार खोऱ्यातील वाघाचा' राजकीय इतिहास वेगळाच आहे.

कंधार तालुक्यातील काँग्रेस नेत्यांनी बरेच वर्षे विरोधी पक्ष म्हणून संघर्ष केला, म्हणून येथे पक्ष जीवंत आहे. काँग्रेस पक्षावर अनेक संकटे आली, पण तालुक्यातील अनेक नेत्यांनी पक्ष सोडला नाही! पक्षाशी बेईमानी केली नाही. आजही अनेक निष्ठावंत नेते कार्यकर्ते आहेत. त्यात ज्येष्ठ नेते व माजी आमदार ईश्वरराव भोसीकर व माजी नगराध्यक्ष व पक्षाचे तालुका अध्यक्ष रामराव पवार यांचा उल्लेख करावा लागेल.भोसीकर आणि माझे अधून मधून संपर्क,संवाद होत असतै. परवा भोसीकर यांच्या विवाह सोहळ्यात रामराव पवार यांची भेट बऱ्याच वर्षानंतर झाली. जुन्या आठवणी जागी झाल्या. समाजात अनेक माणसे जातीपलिकडे जाऊन विचार करतात ,माणुसकीचे नाते जपतात.मी त्यांच्याच मदतीमुळे पुढील शिक्षण घेऊ शकलो, हे उपकार मी कधी विसरू शकणारा नाही. पवार यांनी मी कंधारला शिक्षण घेत असताना त्यांचा मुलगा आनंदा पवार यांचेकडे जात असे.पवारांची प्रिटींग प्रेस होती,त्यांनी रणसंग्राम नावाचे वृत्तपत्र काढत असत. माझ्याकडे शालांत परिक्षेची १२.५० रुपये शुल्क भरण्यासाठी पैसे नव्हते.पवारांनी पैश्यामुळे परीक्षा देणार नाही, असे कळाले.तेंव्हा त्यांनी मला परीक्षा शुल्क भरण्यासाठी पैसे दिले. पण मी त्यांना मला तसे पैसे देऊ नका, काही तर काम द्या! म्हंटल्यानंतर त्यांनी माझ्या पाठीवर हात मायेचा फिरविला. तेंव्हा त्यांनी मला प्रिटींग प्रेस मशीनने नंबर मारावयाचे काम दिले. हे करण्यास मला लाज वाटली नाही. आदरणीय पवार अतिशय प्रेमळ स्वभावाचे तर आहेतच, त्यांचेत माणुसकीचा झरा वाहतोय! मी आयुष्यात जात मानली नाही. कारण प्रत्येक व्यक्तींच्या प्रगतीत स्वतःच्या जातीपेक्षा इतर जातीची माणसांचा वाटा अधिक असतो, हे आपण विसरतो. तेंव्हा जातीव्देष टाळला पाहिजे. सामाजिक जीवनात वावरताना आपण जात ही घराच्या उबंरठ्याच्या आतच ठेवली वागल पाहिजे. सद्या प्रत्येक जण 'आम्हाला जातीचा अभिमान आहे' असे म्हणतात. जातीच्या संघटना व अधिवेशन होतात. राजकीय नेते त्या व्यासपीठावर जातात! प्रकाश आंबेडकर एकदा म्हणाले, शाळेच्या टी.सी वर जात लिहिल्या जाऊ! त्यावर भारतीय लिहिले पाहिजे. नांदेड जिल्ह्यात मांडवी येथील बंजारा या आदिवासी समाजात उत्तमराव राठोड हे एक मोठे राजकीय नेते होते. ते आमदार, खासदार, मंत्री होते आदरणीय उत्तमराव राठोड यांचे मुळे लोकमत परिवारात गेलो. प्रथम नांदेडचे स्थानिक गोदातीर समाचारमध्ये काम केले. गोदातीरने संपादक काकासाहेब रसाळ, त्यांचे चिरंजीव रविंद्र रसाळ, रमेश रसाळ प्रभाकराव रावके,कृष्णा शेवडीकर यांनी पत्रकाराचे धडे दिले. नांदेडमध्ये गोदातीर पत्रकारांची मोठी फळी तयार केली. १९७८ किनवटमध्ये पोलिस अधीक्षक टी. शृगांरवेल गेले असताना तेथे काँग्रेस नेते व त्यांच्या भेटीवरून वाद झाला. वास्तविक पोलिस अधीक्षक अतिशय निस्पृह, कर्तव्यदक्ष अधिकारी होते. पण कोणी तरी चुकीचा संदेश दिला. त्यातून राजकीय वातावरण तापले. यावेळी पोलिसांनी गोळीबार केला. यात काँग्रेसचे नेते जे. नागोराव ठार झाले. याचे वृत्त मी लोकमत नागपूरला तारेने पाठविले. लोकमतचा वार्ताहर नसतानाही लोकमतमध्ये मुख्य मथळा देऊन








वृत्त दिले.नागपूर अधिवेशन चालू असल्याने घटनेचे पडसाद विधानसभेत उमटले. त्यावेळी तत्कालिन मुख्यमंत्री शरद पवार यांनी किनवट गोळीबाराची न्यायालयीन चौकशीची घोषणा केली. तर गृहमंत्र्यांनी पोलीस अधीक्षकांना निलंबीत करण्याची घोषणा केली, पण हे राज्य शासनाच्या अधिकार कक्षेत येत नाही, हे नंतर कळाले! मी गोळीबाराच्या न्यायालयीन वृत्त गोदातीर समाचारमध्ये देत असे. तत्पूर्वी राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांचा संप झाला होता, तो ५४ दिवस चालला होता. तेंव्हा तत्कालिन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी 'कर्मचाऱ्यांना एक खडकूही देणार नाही' अशी भूमिका घेतली होती. नंतर राज्य शासन व कर्मचारी संघटनेत वाटाघाटी झाल्या संप मिटला.या संपावेळी हंगामी कर्मचारी म्हणून तरूणांना नोकरीवर घेतले होते. त्यांना 'वसंतसेना' म्हंटले जायचे! संघटनेचे नेतृत्व केले होते. या तरूणांना नोकरीत प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक माणसाच्या जीवनात असा व्यक्ती भेटत असता व आयुष्याचा प्रवास बदलून टाकतो. नागपूर अधिवेशनच्यावेळी विधानभवनाच्या बाहेर नेते उत्तमराव राठोड यांची भेट झाली. त्यांनी मला बोलावले, कसा काय आलास? असा प्रश्न विचारला. लगेचच 'चल तुला मंत्री जवाहलालजी दर्डाची भेट करून देतो' असे सांगून त्यांचेकडे नेले.त्यांनी दर्डा यांना हा तरुण मुलगा वार्ताहर आहे चांगले लिहितो', तुमच्या कामाचा आहे, असे सांगितले. तेंव्हा बाबूजींनी (दर्डांनी) म्हणाले 'मराठवाड्यात लोकमत सुरू करावयाचे आहे, तेंव्हा बोलवेन!' एवढीच माझी व बाबूची भेट झाली. हे मी विसरलो. पण दूरदृष्टी असलेली माणसे विसरत नाहीत.दोन - तीन वर्षांनी दर्डांनी त्यांनी यवतमाळचे विश्वासू प्रतिनिधी माणिकराव भोयर यांना नांदेडला पाठविले व भोयर माझे घर शोधत आले. त्यांनी मला बाबूजींनी लोकमतमध्ये नोकरीवर येण्याचा निरोप दिला आहे. त्यानंतर यवतमाळ येथे गेल्यानंतर बाबूजी, विजयजी दर्डा यांचे समक्ष लोकमतच्या नोकरीचे पत्र दिल्यानंतर औरंगाबादला राजेंद्र दर्डा यांचे मार्गदर्शनाखाली काम केले. दर्डा परिवारांचा विश्वास आशीर्वाद यामुळे पत्रकार झालो. २०१४ मध्ये निवृत्त झालो. मध्यंतरी अनेक संकटे आली इतर गावकरी व तरूण भारत मध्ये काम केले. मित्र जात पाहून मित्र जोडला जात नाहीत, ती नैसर्गिक घटना आहे. माझे मित्र विविध जाती, धर्मांचे आहेत संकटावेळी नातेवाईकांपेक्षा मित्र धावून येत असतात! यात चंद्रकांत पाटील सादीक रूपाणी, प्रकाश खेडकर, रमेश डागा, सुनील नेरलकर,गोविंद माळवतकर, लक्ष्मीकांत हजारी, गादेवार आदींनी मला स्वतःचे घरकुल मिळावे, यासाठी मित्रांनी मदतीचे हात पुढाकार घेतला लोकमतमधून निवृत्ती होण्याआधी काही दिवशी आधी ज्येष्ठ पत्रकार सुधाकरराव डोईफोडे यांची भेट झाली. त्यांनी निवृत्तीनंतर आमच्या दैनिकासाठी लिहा!असा दिला सल्ला,प्रेरणा दिली. तुम्ही लिहिणेबंद करू नका! तेव्हा लिहित विविध विषयावर लेख लिहित आहे, सुमारे तीन हजार लेखाचा टप्पा पार केला आहे. मी कोणात्याही राजकीय पक्षाचा सदस्य नाही. माझ्या लेखाशी प्रत्येकजण सहमत व्हावे, असा आग्रह नाही. सामाजिक प्रसार माध्यमे पेव फुटले आहे! यावर आता नियंत्रण राहिले नाही. ते धोकादायक आहे. हे माध्यम संवाद,चर्चेसाठी चांगले माध्यम आहे. यातून मित्र जोडले जातात. पण कोणाच्याही लिखाणावर मत मांडताना वेयक्तीक टीका न करता, त्या विषयावर मत मांडले पाहिजे, आज काल सामाजिक प्रसार माध्यमांची भीती वाटते. यावर अश्लिल बोलणे शिव्या धमक्या दिल्या जातात. लेख अनेक वृत्तपत्र प्रकाशित करत असतात. जीवनात अनेक आर्थिक व आरोग्याचे संकट आली. अवैध सावकारीत वडीलोपार्जीत शेती विकण्याची वेळ आली. पण लिखाण करणे अजून तरी सोडले नाही,ते एक व्यसन लागले आहे. मला लेखांचे पुस्तक काढण्याचा सल्ला अनेकांनी दिला. पण ते आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही.

# आपली माणसे, किती आपली ?




सुजाता नवनाथ पुरी
अहमदनगर
संपर्क 8421426337

आधुनिक केसरी

**युद्ध मे कभी नही हारे, हम डरते है छलचंदोसे, हर बार पराजय पायी है,अपने घर के जयचंदो से... आपली माणसं ज्यांना आपण म्हणतो ती खरच आपली असतात का? आपले म्हणून आपण त्यांना आपले मानतो,ह्रुदयात जागा देतो पण एका अवचित क्षणी आपल्याला कळतं कि आजवर आपण ज्यांना आपले आपले म्हणत होतो ते मुळी आपले नव्हतेच.ज्या साठी आपण खूप काही सहन केलेलं असतं आणि खूप काही त्याग केलेला असतो अशा वेळी त्यांचे खरे रूप आपल्यासमोर येणे हा खूप मोठा धक्का असतो.**

असे म्हणतात कि जीवनात आपण एकटे जन्माला येतो आणि जाताना ही एकटेच जातो. परंतु या येण्या जाण्याच्या मधला जो कालावधी असतो ज्याला आपण जीवन म्हणतो, या जीवनाची वाट आपल्या माणसांच्या साथीने सुखकर होत असते,तसं पाहिलं तर कुणाचं आयुष्य हे हिरवळीवरून चालणाऱ्या मृदू मुलायम पावलांसारखं नसतं तर प्रत्येकाच्या आयुष्यात प्रत्येकाच्या वाट्याला काही ना काही संघर्ष आणि दुःख हे आलेलंच असते.



परंतु एकमेकांच्या साथीने हे दुःख पचवण्याची ताकद माणसांमध्ये निर्माण होते. अशावेळी साथ देणारी काही माणसे आपल्या कायम जवळ असली तरी खऱ्या अर्थाने ती आपली असतात का असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. दुसऱ्या माणसाच्या मनातील विचारांचे ज्ञान जर आपल्याला होत असते तर समोरचा माणूस किती आपला आहे हे लगेच समजले असते, परंतु असे होत नाही. हे ही चांगलेच आहे. असे जर झाले असते तर माणसाचा माणसावरचा आणि जगण्यावरचा विश्वास कायमचा उडाला असता. आपल्याशी गोड बोलणारी आणि वर वर आपलं कौतुक करणारी काही माणसं आतून मात्र आपल्याशी वैरभावना निभावत असतात. पण हे करताना मात्र ते आपले जवळचे आहेत असा भास निर्माण करत असतात.आपण ही मग त्यांच्या दिखाऊ, चांगुलपणाला बळी पडतो. प्रशंसा कुणाला आवडत नसते. ती तर सगळ्यांना हवीहवीशी वाटते. अशा वेळी कडू बोलणाऱ्या लोकांना आपण आपले दुश्मन समजून घेतो. परंतु प्रशंसेमागे असलेला स्वार्थ आणि कडू बोलण्यामागे असणारे हितचिंतक हे आपल्याला ओळखणे अतिशय गरजेचे असते. आपल्या अवतीभवती असणाऱ्या माणसांचे खरे रूप जेव्हा आपल्यासमोर येते तेव्हा शब्द सापडत नाहीत आणि भावनाही हरवून जातात. अनुभव आलेली माणसे एक तर भयंकर क्रूर होतात आणि कुणाचेच मन जाणत नाहीत अथवा एकदम अबोल होऊन जातात त्यांना कशाचा काहीही फरक पडत नाही. गोड बोलून नुकसान करणाऱ्या मित्रा पेक्षा समोरून वार करणारा शत्रू हा कितीतरी पटीने अधिक चांगला असतो. जवळ राहूनही काही माणसे आपली होत नसतात.ती फक्त अस भासवता त परंतु त्याचा खरा चेहरा मात्र वेगळा असतो. अशावेळी जर त्यांचा खरा चेहरा पुराव्याच्या स्वरूपात आपल्या समोर आला तरी काही नाती अथवा सबंध इतके जवळचे असतात कि समोरचा माणूस आपल्याशी खोटं बोलतोय हे कळत असून ही आपण त्याचे म्हणणे ऐकत आहोत हा अभिनय सर्वात अवघड असतो. खरं तर माणसाने नेहमी असा विचार करावा कि आपण जे दुसऱ्या बरोबर वागतोय तेच जर दुसरा आपल्याशी वागला तर आपल्याला आवडेल का ? यालाच समानानुभुती असे म्हणतात.याचे भान ठेवले तर मग लोक एकमेकांच्या दुःखाने आनंदी होत नाहीत. म्हणूनच माणसे कशी ही वागू दे, आपण त्याचं वाईट वाटून घ्यायचं नाही.एक अनुभव म्हणून त्यातून काही तरी शिकवून घेऊन पुढे चालत राहणे हाच जीवन जगण्याचा उत्तम मार्ग आहे...

***नकाब बदल बदल के मिले मुझे फसाने वाले,***
***मैने देखे है कई रंग बदलने वाले.***
***तुने चुप रहकर सितम और भी ढाये मुझपर,***
***तुझसे तो अच्छे है मेरे हाल पर हसने वाले***

आपले सांत्वन करणारे धीर देणारे आणि आपल्या दुःखात दुःखी होणारी खरी माणसे सर्वांनाच मिळो..

# घर बांधणे आहे

आधुनिक केसरी

घर बांधणे आहे असा ध्यास प्रत्येकांच्या मनात असतो. प्रत्येकाला वाटत असतं की आपण मानव जन्म घेतला ना. मग एकतरी घर बांधावं. घर मोठं जरी नसलं तरी चांगलं असावं. त्यासाठी कोणी कर्ज काढत असतात आणि घर बांधत असतात.घर बांधण्यासाठी कोणी चोऱ्याही करताना पाहिले. कोणी सर्रास चोरीही करीत असतात. घर बांधणाऱ्यांच्या गर्दीत हवसे, नवशे व गवसेही असतात. हौसे म्हणजे हौशीनं घर बांधणं. याचाच अर्थ असा की ज्यांना घर बांधण्यात आनंद वाटत असतो असे. नवशे अर्थात असे की जे माझं घर बनावं यासाठी देवाजजवळ साकडे घालतात असे आणि गवसे म्हणजे ज्यांना घर बांधायची इच्छा नसते, परंतू जवळ जो पैसा असतो. त्या पैशाचा वापर कुठे करायचा असा प्रश्नन असतो त्यांच्या मनात. तो पैसा खर्च करण्यासाठी अशी मंडळी घर बांधत असतात. घर बांधण्यातून अशा लोकांचा पैसा खर्च होत नाही. उलट काही काळानं जशी जागेची किंमत वाढते. तशी त्यांच्या घराचिही किंमत वाढत असते.



घर बांधण्यासाठी सर्वात प्रथम पकडावा लागतो इंजिनीयर. हा इंजिनीयर कोणतेच काम करीत नाही. फक्त नकाशा बनवतो व त्याला डिग्रीची एक सांक्षांत्कीत प्रत लावून तो नकाशा पास करुन देतो. बदल्यात एकूण रकमेतून टक्केवारीनं पैसे घेतो. तो शिकलेला असतो. त्याला काळ्याचं पांढरं कसं करायचं व पांढ-याचं काळं कसं करायचं ते सर्व समजतं. असा इंजिनीयर जेव्हा घराचं बांधकाम रितसर आहे की नाही याची पाहणी करतो. तेव्हा जे बांधकाम अवैध असतं. तेही मोजत असतो व जे बांधकाम अवैध असेल, ते तोडायला लावतो. या तोडफोडीमध्ये मालकाचं अतोनात नुकसान होते कधीकधी. इंजिनीयरनंतर ते बांधकाम बिल्डरच्या हातात जातं. ह्या बिल्डरकडे मजुरांची रांग असते. सा-याच प्रकारचे मजूर असतात त्याचेकडे. हे मजूर निष्णांत असतात. ह्या मजूरांसमोर इंजिनीयरनं बनवलेला बिल्डरकरवी नकाशा मिळताच तो नकाशा त्यांच्या अगदी तोंडपाठ होतो.

मजूरांमध्येही काही घटक असतात. सर्वात मोठा मजूर म्हणजे ठेकेदार. या ठेकेदाराकडे अनेक मिस्त्री असतात. जसे. सेंट्रींगचे मिस्त्री. जुळाईचे मिस्त्री, प्लॉस्टरचे मिस्त्री, प्लॉयवुडचे मिस्त्री, इलेक्ट्रीकचे मिस्त्री, नळलाईनचे मिस्त्री, पेंटींगचे मिस्त्री, टाईल्सफिटींगचे मिस्त्री, रेलिंगचे मिस्त्री, पी ओ पीचे मिस्त्री. इत्यादी स्वरुपाचे मिस्त्री. हे सर्व मिस्त्री ठेकेदाराचे आदेश काटेकोरपणे पाळत असतात. कारण त्यांचं काम थोडंसं जरी चुकलं की त्यांचे पैसे कापले जातात त्यांच्या पगारातून. या मिस्त्रीनंतर त्यांच्यनंतरचा असतो सामान्य मजूरवर्ग. ज्यांना कल्पकता मुळातच समजत नाही आणि समजतही असते तरी त्यांच्या कल्पकतेचा या घर बांधण्याच्या धंद्यात काहीही उपयोग नसतो. ते फक्त राबराब राबत असतात. त्यांच्याबाबत ठेकेदाराच्या मनात कोणतीच दयामाया नसते. जेही श्रीमंत वा शिकले सवरले लोकं असतात. ते असे, इंजिनीयर पकडून घर बांधण्याची कामं करीत असतात. घर बांधण्याला हे लोकं डोकेदुखी समजत असून कोण आपल्यामागं अशी डोकेदुखी लावेल, याचा विचार प्रत्येकजण करीत असतो. यामुळंच ते घराचं बांधकाम इंजिनीयर लावून करीत असतात. काही लोकं बिल्डरला देत असतात तर काही लोकं ठेकेदाराला. घर बांधण्याच्या शर्यतीत कोणीही आपल्या पाठीमागं डोकेदुखी लावत नाहीत. ही सत्य बाब आहे. या शर्यतीत काही लोकं असेही असतात की जे आपल्या मागं डोकेदुखी लागू नये म्हणून फ्लँट विकत घेत असतात आणि त्या फ्लँटमध्ये विनाडोकेदुखीनं अगदी स्वतंत्र्यपणे राहात असतात. परंतू अशी फ्लँटमध्ये राहात असलेली मंडळी आपल्या घराच्या वरच्या मजल्याचं बांधकाम करु शकत नाही. कारण त्यांना जागाच सिमीत असते. असे फ्लँट श्रीमंत लोकंच विकत घेत असतात. काही मात्र गरीब असतात आणि जे गरीब असतात. ते लहानशी का होईना, जागा विकत घेत असतात व त्यावर बांधकाम करीत असतात. त्यातच अशा गरिबांच्या वाट्याला ती मंडळी जास्त पुढे जावू नये म्हणून त्यांचे पाय ओढणारे शेजारी भरपूर असतात. ते विनाकारणच्या काड्या करीत असतात त्यांच्या घर बांधण्यात. त्यांनी परवानगी मागितली की नाही, ते घर वांद्यात तर नाही, तसेच त्यांचं बांधकाम कसं थांबवता येईल. यासाठीही ते प्रयत्न करत असतात. त्यांच्याबाबत सांगायचं झाल्यास नकटीच्या विवाहाला सतरा विघ्न अशी त्यांची अवस्था असते. पर्यायाने सांगायचं झाल्यास घर बांधणे हे काम अति सोपे वाटत असले तरी ते सोपे काम नाही. त्यातच त्या कामात जबाबदारी असते. कधीकधी घर बांधकाम करताना कर्ज काढावं लागतं, त्यावेळी कर्जाचे हप्ते वेळीच चुकवता न आल्यानं कर्जदार दारात येतात. तकादा लावतात व तसे कर्जाचे हप्ते वेळीच न चुकविल्यास किंवा न चुकवता आल्यानं घर निलामी करतात. त्यामुळे ज्या घरासाठी आपण एवढी त्रेधातिरपीट केली, ते घर अगदी डोळ्यासमोर विकलं जातं आणि आपल्या डोळ्यासमोर आपल्या हातून जात असतं. महत्वाचं सांगायचं झाल्यास घर बाधावं आपण, बांधकाम करु नये असं नाही. परंतू घर बांधकाम करताना सर्व बाबी विचारात घ्यायला हव्यात. जेणेकरून ते बांधल्यानंतर आपल्याला अडचण येणार नाही व ते व्यवस्थीत बांधता येईल. तसेच कोणीही आपल्या दारात कर्ज मागण्यासाठी येणार नाही याची खबरदारी घेतलेली बरी. तसेच ही देखील काळजी घ्यावी की कोणी ठेकेदार वा इंजिनियर आपल्याला चिंताग्रस्त करणार नाही.

अंकुश शिंगाडे
संपर्क क्र. ९३७३३५९४५०

# मेस्सीचे स्वप्न साकार झाले !



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**श्वास रोखून धरायला लावणाऱ्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाने गत विजेत्या फ्रांसला पेनल्टी शूटआऊटमध्ये ४ - २ असे पराभूत करून विश्वचषकावर नाव कोरत गेल्या महिन्या भरापासून सुरू असलेल्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या कुंभमेळ्याची सांगता केली. कतार मध्ये खेळवली गेलेली ही विश्वचषक स्पर्धा थरारकच झाली. स्पर्धेतील प्रत्येक सामना डोळ्यांचे पारणे फेडणारा होता आणि अंतिम सामान्याने तर त्यावर कळसच केला. विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात क्षणाक्षणाला हृदयाचा ठोका चुकत होता. सामन्याचे पारडे क्षणाक्षणाला बदलत होते.**

पहिल्या हाफमध्ये अर्जेंटिनाने दोन गोल करताच हा सामना अर्जेंटिना सहज जिंकणार असे वाटत असतांनाच फ्रांसने दुसऱ्या हाफ मध्ये जबरदस्त कमबॅक करत दोन गोल करून सामन्यात बरोबरी साधली. पाहिल्या हाफवर अर्जेंटिनाने वर्चस्व गाजवले तर दुसऱ्या हाफवर फ्रांसने वर्चस्व गाजवले. अंतिम सामन्यातील पहिल्या हाफमध्ये अर्जेंटिनाचा लियोनेल मेस्सी शेर ठरला तर दुसऱ्या हाफमध्ये फ्रांसचा एम्बापे सव्वाशेर ठरला. अर्जेंटिनाचे प्रेक्षकांनी मेस्सी मेस्सीच्या गजराने स्टेडियम डोक्यावर घेतले तर फ्रांसच्या प्रेक्षकांनी एम्बापे एम्बापेच्या गजराने स्टेडियम दुमदुमून सोडले. दोन्ही देशांच्या प्रेक्षकांनी आपल्या संघाला जोरदार पाठिंबा दिला. अर्जेंटिना आणि फ्रांस दोन्ही देशांच्या खेळाडूंनी आपल्या संघाला विश्वविजयी करण्यासाठी जीवाची पराकाष्ठा केल्याने सामना पेनल्टी शूटआऊट मध्ये पोहचला. पेनल्टी शूटआउट मध्ये अर्जेंटिनाच्या गोल राक्षकाने कमाल केल्याने फ्रांसचे सलग दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरण्याचे स्वप्न भंगले आणि अर्जेंटिना ३६ वर्षानंतर विश्वविजयी बनला. अर्जेंटिना विश्वविजयी बनताच लियोनेल मेस्सीचे स्वप्न साकार झाले. लियोनेल मेस्सी अर्जेंटिनाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फुटबॉलपटू. आपल्या देशाला विश्वविजयी करणे हेच स्वप्न घेऊन तो आयुष्यभर जगला. ही त्याची अखेरची विश्वचषक स्पर्धा होती त्यामुळे या स्पर्धेत विजय मिळवूनच मेस्सीला निरोप द्यायचा असा निर्धार अर्जेंटिनाच्या खेळाडूंनी केला होता मात्र आपल्या पहिल्याच सामन्यात नवख्या आणि दुबळ्या सौदी अरेबियाकडून पराभवाचा धक्का बसल्याने मेस्सीचे हे स्वप्न स्वप्नच राहणार असे क्रीडाप्रेमींना वाटत




होते मात्र पहिल्या सामन्यातील पराभवाने अर्जेंटिनाचे खेळाडू खडबडून जागे झाले त्यांनी आपल्या खेळातील उणिवा दूर केल्या आणि मग मागे वळून पाहिले नाही. अर्जेंटिनाचा दुसऱ्या सामन्यापासून सुरू झालेला विजयाचा धडाका अंतिम सामन्यापर्यंत कायम राहिला. लियानेल मेस्सीने आजवर तीनवेळा विश्वकरंडक स्पर्धेत भाग घेतला. आठ वर्षांपूर्वी ब्राझीलमध्ये सर्वोत्कृष्ट खेळ करूनही त्याला दुःखाश्रू गाळत निराशपणे मायदेशी परतावे लागले होते. त्यावेळी तो इतका निराश झाला होता की स्पर्धा संपल्यानंतर त्याने तडफातडफी निवृत्ती स्वीकारली होती मात्र क्रीडापेमी आणि अर्जेंटिनाच्या सरकारने त्याला निवृत्ती मागे घेण्याची विनंती केल्याने तो पुन्हा मैदानात उतरला. रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात आठ वर्षांपूर्वीची पुनरावृत्ती होऊ द्यायची नाही याच निर्धाराने तो मैदानात उतरला आणि हाच निर्धार अर्जेंटिनाला विश्वविजेता बनवून गेला. अर्जेंटिनाने या सामन्यात जी विजूगिशी वृत्ती दाखवली त्याला तोड नाही. फ्रांसने दोन गोलची आघाडी भरून काढल्यानंतरही हा संघ डागमगला नाही. अर्जेंटिनाच्या खेळाडूंनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवत खेळ केला. आपल्याला एक जरी संधी मिळाली तरी आपण विश्वविजेता होऊ असा विश्वास या खेळाडूंना होता. हीच संधी त्यांना पेनल्टी शूटआऊटमध्ये मिळाली आणि त्यांनी ती संधी साधत फ्रांसला नामोहरम करत इतिहास घडवला.

# स्वत:ला ओळखले तरच यशस्वी व्हाल!

आधुनिक केसरी

जीवनात आपलं नशीब मेहनतीने घडवणारी अनेक माणसं आहेत. ज्यांनी स्वप्ने पाहिली व प्रत्यक्षात साकारली देखिल ज्यांना जीवनात यशस्वी व्हायचे आहे अशांनी स्वःताला ओळखले पाहिजे.आधी आपण कोण आहोत आपल्याला नेमके काय साध्य करायचे आहे. हे ठरवता आले पाहिजे. संकटांना घाबरू नका, टेन्शन घेऊ नका, उलट परीस्थीतीवर मात करून जीवनात यशस्वी व्हा.प्रत्येकाच्या जीवनात कसोटीचा काळ येत असतो.यातुनच आपल्याला खुप काही शिकायला मिळते.स्वताःला ओळखुन चांगले नियोजन करा, वेगवेगळ्या योजना आखा. प्रगतीची वाट कोणीही रोखू शकत नाही.ती आपल्या हातामध्ये आहे. सद्गुरू श्री वामनराव पै यांनी सांगितले आहे की तुच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार, खरोखर अतिशय समर्पक शब्दांत त्यांनी सांगितले आहे की आपण च आपल्या जीवनाचे भाग्य विधाते आहोत. त्यासाठी स्वतःला ओळखले पाहिजे तरच आपण पुढे पाऊल टाकु शकतो. मनात कोणतेही दुःख कवटाळत बसू नका. आपल्या वाटा आपल्यालाच शोधाव्या लागतील. जीवनात अनेक समस्या निर्माण होतील त्यासाठी धैर्याने त्यावर मात करा. आत्मविश्वास ढळु देऊ नका. कारण आपली स्वप्ने ही आपल्यालाच पुर्ण करावयाची आहे.स्वताःला ओळखणे हीच आयुष्याची गुरुकिल्ली आहे.स्वताःला ओळखणे खुप गरजेचे आहे. कारण प्रत्येक बदलाची सुरुवात ही स्वतः पासुन होते. स्वताःला ओळखून स्वतःच्या उणिवा शोधायला हव्यात. आयुष्य ही एक खडतर परीक्षा आहे जो स्वतःला ओळखतो तोच या परीक्षेत पास होतो. माणसाचे जीवन कठीण आहे. अनेक वेळा इच्छा नसतानाही बर्याच वेळा दुःखाचा सामना करावा लागतो. त्यासाठी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर स्वतःला ओळखून जबाबदारी घ्यायला शिकले पाहिजे. आपण जसे आहोत तसे स्वतःला स्विकारले तर आपली प्रगती कोणी सुद्धा रोखू शकणार नाही. स्वताःला ओळखून आपल्यातील सुप्त गुणांना वाट करुन दिली पाहिजे. आपल्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा. आयुष्यात येणार्या संधी वाया घालवू नका. मी काहीतरी करून दाखविनच हा मुलमंत्र जपा. मनात न्युनगंड बाळगू नका. आपण इतरांपेक्षा कमी आहोत वा इतर आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे.असा समज मनातून काढून टाका. स्वताःला ओळखून चांगल्या गोष्टींचा स्वीकार करा. स्वताःला ओळखले तरच यशस्वी व्हाल.

# तंत्रज्ञान आणि पालक



जयेश अर्जुन माधव

आधुनिक केसरी

**तीन वर्षाच्या मुलापासून ते नव्वद वर्षांच्या आजोबांपर्यंत जग फक्त एका गोष्टी बरोबर जोडले गेले आहे, ती गोष्ट म्हणजे तंत्रज्ञान..! आपल्या मुलाने काहितरी भव्य दिव्य करावं, खुप काहीतरी चांगलं करून दाखवावं यासाठी प्रत्येक पालक झटत असतात. आपलं मुल चांगलं बनावं यासाठी मुलांच्या सर्व गरजा पुऱ्या करत असतात. सर्वांना फळ चांगलं हवं असतं. आपण सगळे पालक फळ चांगलं मिळावं म्हणून फळावरच काम करत असतो, कोणीही मुळांवर काम करायला तयार नसतो.**

भारतीय शिक्षण पद्धतीची मुळे शिक्षक आणि पालक ही आहेत, तर विद्यार्थी ही फळं आहेत. सर्वच जण मुले चांगली हुशार झाली पाहीजेत याची अपेक्षा करतात.म्हणजेच फळ चांगलं हवं पण मुळांची मशागत करायला कोणी तयार नाही. खरंतर मुळांवर काम करण्याची खरी गरज आहे. झाडांचं मुळ चांगलं तर फळही चांगलंच येणार..! निरंतर सुधार ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानामुळे सतत नवीन नवीन गोष्टी घडत असतात. आपण जेव्हा लहान होतो तेव्हा रेडिओ होता त्यानंतर ब्लॅक अण्ड व्हाईट टी.व्ही. आला, त्यानंतर कलर टि.व्ही आला. पहिला खुप मोठा टि.व्ही होता आता एकदम चपटा झाला. ट्रंकॉल,पेजर,फोन,मोबाईल आणि आता स्मार्ट फोन आला.बघता बघता कलीयुगाने आपल्या घरात कधी प्रवेश केला हे समजलेच नाही. तंत्रज्ञान माणसाच्या जीवनातला अविभाज्य घटक आहे पण त्याचा वापर कसा करायला हवा हे आधी शिकायला हवे.आपल्याकडे अगोदरही २४ तासच होते आणि आताही २४ तासच आहेत.पण आता आपल्याकडे वेळ नाही. आपल्या हातात मोबाईल यायला बरीच वर्षे गेली पण आपल्या मुलांच्या हातात मोबाईल लहान वयातच आले. हा फरक जेवढा कमी झालाय तेवढा त्रास वाढला आहे. जेव्हा एखादी गोष्ट आपल्या अंतर्मनात जाते तेव्हा ती सवय बनून जाते आणि एकदा बनलेली सवय सहज सुटणे अशक्य..! तंत्रज्ञान चांगले असले तरी त्याच्या आहारी जाणे योग्य नव्हे. तंत्रज्ञानाचा फायदा माणसाने प्रगती करण्यासाठी करायला हवा.मसाला वाटण्यासाठी पूर्वी पाटा होता आता मिक्सर आहे, पूर्वी ट्रंकॉल होता आता स्मार्ट फोन आहे. हे होणारे बदल म्हणजेच तंत्रज्ञान होय. आजचा पालक खुप संभ्रमित आहे. योग्य काय आणि अयोग्य काय हे ठरवणं कठीण जात आहे. कारण आपला पायाच आपण विसरत चाललो आहोत.तंत्रज्ञानामुळे माणूस खुप फास्ट झाला आहे. परदेशात खुप चांगल्या प्रकारे याचा उपयोग करत आहेत. आपल्याकडेही तसा प्रयत्न होत आहे. पण पालकांच्या निष्काळजीपणा मुळे ते प्रयत्न फोल ठरत आहेत. काही शाळांमध्ये पुस्तकांचे ओझे कमी करण्यासाठी टॅब वापरायला दिले. हा तंत्रज्ञानाचा फायदा होता पण मुलांनी घरी येवून त्यात फोटो,गाणी, सिनेमा ,गेम आणि नको नको त्या गोष्टी भरून ठेवल्या. शाळेकडून बरेच प्रयत्न केले गेले पण प्रत्येक मुलांवर लक्ष ठेवण शक्य नव्हते. हि जबाबदारी खरंतर पालकांची होती. पालकांनी आपली जबाबदारी वेळीच ओळखली असती तर मुलांचे दप्तराचे ओझे कमी झाले असते. परदेशातील मुले तंत्रज्ञानाची मदत घेऊन अभ्यास करत आहेत आणि आपली मुले मात्र फेसबुक, व्हाट्सअप आणि अनेक सोशल साईट्सवर वेळ घालवत आहेत. पालकही तेच करत आहेत. घराघरात प्रत्येक लहान थोरांच्या हातात स्मार्टफोन आला आहे. परिणामांचा कोणीच विचार करत नाही आहे. व्हाट्सअपवर पाठवलेला प्रत्येक मेसेज अत्यंत महत्वाचा वाटू लागला आहे त्यामुळे थोड्या थोड्या वेळाने मोबाईल तपासत रहाण्याची आपल्याला सवय लागलेली आहे.आपण तंत्रज्ञानाच्या आहारी गेलो आहोत. आपल्या समोर असलेल्या व्यक्तींकडे दुर्लक्ष करून आपण आलेले मेसेज बघण्यात दंग होऊ लागलोय. म्हणजेच आपल्या समोर कोण आहे याबद्दल आपण बेफिकीर झालोय. घरात आल्यावर जेवतानाही आपल्यासमोर टी.व्ही. चालू असयला हवा.त्यामुळे घरात कोणाशीही मनमोकळ बोलणं होत नाही. कोणाला कार्यक्रम बघायचे असतात, कोणाला मॅच बघायची असते तर कोणाला कार्टून्स..! आपल्या जीवनात काय चालले आहे यावर चर्चा करायला कोणाला वेळ नाही. अगोदर घरात एकच बाबा असायचे..! सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्याच्याकडे असायची पण आता प्रत्येक घरात एक नवीन बाबा आलाय.. गुगल बाबा..! त्यामुळे घरातल्या बाबाला आता कोण विचारेनासे झालेय. फेसबुकवर फोटो टाकून किती लाईक्स आणि किती कमेंट्स आलेत ते आपण थोड्या थोड्या वेळाने तपासत राहू लागलोय. यात मुलांबरोबर पालकही तेवढेच सहभागी असतात. अजुन एक नवीन प्रकार.. सुसाईड अटेम्प्ट..! सरकारी आकडेवारी नुसार देशात जवळपास १४००० मुले शिक्षणाचा ताण सहन न झाल्यामुळे आत्महत्या करतात. शाळेत,कॉलेजमध्ये जाणाऱ्या आपल्या मुलांवर आपला लक्ष असतो काय..? आपली मुले आपल्या पासून बर्याच गोष्टी लपवत असतात. मुलांच्या देहबोलीतून बर्याच गोष्टी स्पष्ट होत असतात. पण एवढा वेळ आहे कोणाकडे..? विशेषतः कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलांकडे लक्ष



असणे गरजेचे असते. वेगवेगळ्या कुटुंबातील, वेगवेगळ्या विचारांची मुले एकत्र आलेली असतात.मुलांना कोणाचे काय आवडू लागेल याचा नेम नसतो. अशावेळी पालकांनी सजग असणे महत्त्वाचे आहे. आपली मुले कोणाबरोबर असतात, कोणाशी मैत्री करतात, तणावाखाली वावरत तर नाही ना..हे पालक म्हणून आपल्याला मुलांच्या देहबोलीतून समजायला हवे. आपल्या मुलांच्या हाती स्मार्ट फोन देणे म्हणजे माकडाच्या हातात कोलीत देण्या सारखेच आहे. त्यामुळे निट लक्ष असणे गरजेचे आहे.

तंत्रज्ञानाच्या दृष्टचक्रात फक्त मुलेच अडकली आहेत असे नाही यात पालकही अडकले आहेत. आपल्या मुलांना या दृष्टचक्रातून बाहेर काढायचे असेल तर प्रथम या दृष्टचक्रातून आई वडीलांना बाहेर पडावं लागेल. दहावी पर्यंत हुशार असणारी मुले कॉलेजला गेल्यावर अचानक बिघडू लागतात हे घरात लगेच लक्षात यायला हवे. सोशल माडीयाच्या अती वापरामुळे प्रचंड नकारात्मकता वाढीस लागली आहे. प्रत्येक गोष्टीला वेळीच आवर घातला नाही तर वेळच निघून जाईल .आपल्या लहानपणी शाळा आणि अभ्यास संपला की आपण मैदानी खेळ खेळत असू पण आता मुले मात्र इंटरनेट, टी.व्ही.,गेम यात रमत आहेत. मोबाईल वर गेम खेळणार्या मुलांचे प्रमाण वाढत आहे.गेम कसले असतात तर गोळ्या झाडण्याचे.. हाणामारी करण्याचे..! सतत हे गेम खेळण्यामुळे मुलांना त्याची सवय होते. त्यांच्या अंतर्मनात ते उतरलं जात आणि पुढे तोच त्यांचा स्वभाव बनतो. पालकांना कळतही नाही कि आपलं मुल असं अचानक हिंस्त्र कसं काय बनलय..? पालक म्हणून आपणच याला जबाबदार असतो पण ते आपल्यालाच कळत नाही. भावनिक पातळी दिवसेंदिवस खालावत चालली आहे. त्याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागत आहे. अश्मयुगातून आपण आधुनिक युगात आलो खरे पण तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे आपण पुन्हा अश्मयुगाकडे जायची तयारी करू लागलोय. जगात ६०% लोकांना आरोग्याच्या समस्या आहेत पैकी २४% लोकांना फक्त तंत्रज्ञानामुळे समस्या आहेत. शारीरिक हालचाली मंदावत आहेत. तंत्रज्ञानाच्या वापराने मेंदूचा वापर कमी होत आहे. प्रत्येक पालकांनी विचार करायला हवा,आपण लहान असताना आपले आई वडील घरात आल्यावर आपण कसे वागायचो..? आपले आई वडील आपल्या बरोबर कसा वेळ घालवायचे..? आणि आपण आपल्या मुलांबरोबर कसा वेळ घालवत आहोत..? हा एक प्रश्न जर पालकांनी सोडवला तर पालकांना तंत्रज्ञानाची भीती बाळगण्याची बिलकुल गरज नाही.

आज आपण एकाच घरात राहूनही संवाद मात्र हरवून बसलो आहोत.इंटरनेट वापरात भारत हा नंबर वन देश बनला आहे. इंटरनेटचा सर्वात जास्त वापर गुड मॉर्निंग आणि गुड नाईटसाठी होऊ लागला आहे हे दुर्दैवी आहे. आपण तंत्रज्ञान वापरायला हवे पण तंत्रज्ञान आपल्याला वापरू लागलं आहे. खरंतर आपण आपल्या सोयीसाठी तंत्रज्ञान वापरत असतो पण ती सोय आपली कधी गरज बनून जाते ते आपल्यालाच कळत नाही. सगळ्या गोष्टी आपल्या हातात असतात फक्त संयम हवा. तुम्ही कोणाबरोबर वेळ घालवता आणि काय वाचता यावर बर्याच गोष्टी अवलंबून असतात. तुम्ही ठरवलात तर काहीही शक्य आहे. मुलांना कुठल्या वयात काय हवं आहे हे आपणच पहायला हवे.आपण काय करतो,आपण काय बघतो, आपण काय वाचतो,आपण काय ऐकतो हे आपली मुलं बघत असतात. हे बघुनच ती मोठी होत असतात.त्यामुळे प्रत्येक पायरीवर आपल्याला सजग रहायला हवे.

तंत्रज्ञान आपलं आयुष्य सुखकर करण्यासाठी आहे, आपलं आयुष्य आनंदी बनवण्यासाठी नाही हे लक्षात असूद्या.

# रेणुकादेवी पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मालेगाव रोडवरील श्री आई रेणुकामाता अर्थात यल्लमादेवी यात्रोत्सवानिमित्त निघालेली पालखी बुधवारी उत्साहात पार पडली. कोरोना महामारीच्या अडीच वर्षांनंतर पालखी सोहळा साजरी करण्यात आला. पोलिस अधीक्षक संजय बारकुंड यांच्या हस्ते महाआरती झाल्यानंतर श्री यल्लमादेवी मंदिर येथून पालखी मिरवणुकीला सुरवात झाली. पालखी सोहळ्यात समाज बांधवांसह भाविकांनी मोठी गर्दी केली. खंडेराव बाजार व दंडेवाला बाबा ग्रुपतर्फे पृष्पवृष्टीने पालखीचे स्वागत झाले. बुधवारी दुपारी पालखी श्री आई रेणुकामाता देवी मंदिर येथून मनोहर टॉकीज, स्व . बाळासाहेब कंड्रे चौक आग्रा रोड, गोपाल टी, पारोळा रोडमार्गे गल्ली क्रमांक चार रथगल्ली, चर्नी रोड, एकनाथ तालीम, सन्मान लॉज, राजकमल टॉकीज मार्गाने प्रस्थान होऊन आई रेणुकामाता देवी मंदिर येथे रात्री पालखीची सांगता झाली. श्री यल्लमादेवीच्या पालखीचे खंडेराव बाजार व दंडेवाला बाबा ग्रुपतर्फे शहरातील आग्रा रोडवरील खंडेराव मंदिराजवळ पृष्पवृष्टीने स्वागत झाले. तसेच भाविकांना साबुदाणा खिचडी वाटप झाली. माजी नगराध्यक्ष महेश मिस्तरी,माजी नगरसेवक गोविंद साखला, नवाब बेग मिर्झा, राष्ट्रवादी अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय कोशाध्यक्ष जोसेफ मलबारी आदी उपस्थित होते .



# नायब तहसीलदार व कोतवालास ३५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** शेती संदर्भातील एक प्रकरणावर सही करून तहसीलदारांच्या टेबलवर ठेवण्याच्या मोबदल्यात महिला निवासी नायब तहसीलदार व कोतवाल यांना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पथकाने रंगेहात पकडले आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे, तक्रारदारांचे चुलत आजोबा व इतर यांचे मौजे पिंपळगाव नजीकच्या गट नंबर १३/१/१ पैकी क्षेत्र ८ हजार ३०० चौरस मीटर क्षेत्र बिनशेती करण्यासाठी केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या प्रकरणातील कार्यालयीन टिप्पणीवर सही करून सदर प्रकरण तहसीलदारांकडे सादर करण्याच्या मोबदल्यात संशयित कल्पना शशिकांत निकुंभ वय -५७, निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय निफाड, जि. नाशिक यांनी तक्रारदाराकडे ४० हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोड अंती ३५ हजार रुपये लाच स्वीकारण्याचे मान्य केले. कल्पना निकुंभ यांच्या सांगण्यावरून कोतवाल अमोल राधाकृष्ण कटारे वय ३८, यांनी प्रशासकीय कार्यालयातील पुरुष प्रसाधन गृहात ३५ हजार रुपयांची लाच पंचासमक्ष घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली. पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, अप्पर पोलीस अधीक्षक एन.एस.न्याहळदे, वाचक पोलीस उप अधीक्षक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक अनिल बागुल, सहसापळा अधिकारी पोलीस निरीक्षक गायत्री जाधव, सापळा पथक पोलीस नाईक अजय गरुड, किरण अहिरराव, संतोष गांगुर्डे यांच्या पथकाने कार्यवाही केली.

# फुलंब्री येथे पायोनियर पी ३३०३ वाणाचे मका मळणी प्रात्यक्षिके सादर

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** आडगाव बु. येथील शेतकरी योगेश सूर्यभान जगताप यांच्या शेतामध्ये पायोनियर पी३३०२ या मका वाणाचा पीक मळणी कार्यक्रम शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थित पार पडला. शेतकरी योगेश सूर्यभान जगताप यांनी खरीप हंगाम २०२२ मध्ये पायोनियर मका पी३३०२ या वाणाची अर्धा एकर क्षेत्रावर ३.५ किलो बियाण्याची लागवड केली होती त्यामध्ये त्यांना अर्धा एकर क्षेत्रात १९.९० क्विंटल मका एवढा उतारा मिळाला आहे. कार्यक्रमाला मुख्य उपस्थिती पायोनियर कंपनीचे टेरिटरी मॅनेजर अमोल सोनुने आणि संजय फरकाडे यांनी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला आडगाव चे सरपंच, धोंडीराम गवरे, सोसायटी चेअरमन दिगंबर भूमे ग्रा.पं.सदस्य जनार्धन धोंडकर, कैलास जगताप, शाईनाथ भुमे, सुधाकर भूमे, दत्तात्रय जगताप, हरिभाऊ भुमे,देवराव, धनाजी धोंडकर, रमेश खोतकर, अंबादास काळे,आबासाहेब भूमे, आबासाहेब धोंडकर, शुभम जगताप, गणेश भूमे, अमोल जगताप, दीपक काळे, योगेश भूमे, भानुदास भूमे, शिवनाथ काळे, मनोज जगताप, काशिनाथ कदम आदींची उपस्थिती होती.

# पोलीस अधीक्षक बारकुंड यांच्या हस्ते सायकल वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ओ. क.गेंदोडिया विद्यालय येथे गोरगरीब अभ्यासू विद्यार्थिनींना पोलीस अधीक्षक संजय बारकुंड साहेब व एलसीबी चे निरीक्षक हेमंत पाटील साहेब यांच्या प्रयत्नाने नवीन सायकली वाटप करण्यात आल्यात.

व शाळेतील शिक्षकांनी शाल व श्रीफळ देऊन यांचा सत्कार करण्यात आला.त्या ठिकाणी सायकल देण्या मागचं कारण असे होते की मुलींना शिक्षणासाठी मनोबल वाढावं व त्यांची शिक्षणात आवड आणि उत्सुकता वाढवण्यासाठी सायकलीच्या निमित्ताने हा उपक्रम राबवण्यात आला. त्या ठिकाणी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी मुलींशी मोकळेपणाने संवाद साधून त्यांच्या मनातली पोलिसांबद्दल असणारी भीती दूर करण्यात आली. दामिनी पथक आणि पोलीस काका पोलीस दीदी यांच्या बद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व शिक्षक, मुख्याध्यापिका, माजी मुख्याध्यापक व इतर कर्मचारी उपस्थित होते.



# वरखेडीखुर्द येथे दोघांना मारहाण करून उमेदवाराचे फोडले डोके

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील वरखेडीखुर्द येथे ग्रामपंचायत निवडणुकीच्या वादातून आमच्या उमेदवाराचे काम का करीत नाही असे म्हणत चौघांनी दोघांना मारहाण करून एकाचे डोके फोडले ही घटना रविवारी दुपारी साडेचार वाजाच्या सुमारास वरखेडीखुर्द, ता. सोयगाव येथे घडली रविवारी रात्री मारहाण करणाऱ्या चौघाविरुद्ध फर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राजू शंकरसिंग राजपूत भरत ओंकारसिंग राजपूत गोविंद ओंकारसिंग राजपूत व संजय गुलाब परदेशी सर्व रा. वरखेडीखुर्द यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे राहुल किसन ताटू, रा. वरखेडीखुर्द ता. सोयगाव यांनी फर्दापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की रविवारी वरखेडीखुर्द ठाणा ग्रुपग्रामपंचायतसाठी मतदान सुरू असल्याने दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास ते मतदान करून घरी जात होते त्याच सुमारास वरखेडीखुर्द बसस्टँड जवळ त्यांना त्याचा भाऊ रवींद्र किसन ताटू यांच्यासोबत गावातीलच भरत ओंकारसिंग राजपूत हा आमच्या ओळखीच्या उमेदवाराचे काम का करत नाही असे म्हणून जोरजोरात भांडण करीत असल्याचे करीत आहे. दिसून आले हा वाद सोडविण्यासाठी राहुल ताटु तिथे गेले असता तिथे उपस्थित असलेल्या गोविंद ओंकार सिंग राजपूत व संजय गुलाब परदेशी या दोघांनी राहुल ताटू याचे दोन्ही हात धरले राजू शंकरसिंग राजपूत याने राहुल ताटू याच्या डोक्यात दगड मारला भरत ओंकारसिंग राजपूत यांनी मारहाण केली या चौघांनी राहुल किसन ताटू व रवींद्र किसन ताटू या दोघांना मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिली याप्रकरणी राहुल किसन ताटू यांच्या फिर्यादीवरून मारहाण करणाऱ्या वरील चौघा विरुद्ध फर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मारहाण करणाऱ्या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेचा पुढील तपास फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे याच्या मार्गदर्शनावरून पो.ना. निलेश लोखंडे मिरखा तडवी हे पुढील तपास करीत आहे.





# पर्यटनस्थळाचा आदेश रद्द करा; हे तर आमचे तीर्थक्षेत्र

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वैजापूरात सकल जैन समाजाचे अतिशय पवित्र पावन तीर्थक्षेत्र श्री सम्मेदशिखरजी येथे झारखंड सरकारने पर्यटन स्थळ जाहीर केल्याचा जाहीर निषेध करण्यासाठी व श्री सम्मेदशिखरजी तिर्थक्षेत्राची पवित्रता गरिमा टिकवण्यासाठी सकल जैन समाज वैजापूर शहर व तालुका तर्फे मूक निदर्शने करून रॅली काढण्यात आली याप्रसंगी उपविभागीय जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी वैजापूरचे नगराध्यक्ष दिनेशसिंग परदेशी, वैजापूर मर्चंट बँकेचे चेअरमन रवींद्र बाळासाहेब संचेती, जि.प.सदस्य पंकज ठोंबरे, भाजपा व्यापारी आघाडी चे निलेशकुमार पारख, नगरसेवक गणेश खैरे, दिनेश राजपूत, स्वप्नील जेजुरकर, उल्हास पाटील ठोंबरे, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रुपेश संचेती, चेअरमन हेमंत संचेती, विजय कासलीवाल, डॉ.संतोष गंगवाल, शांतीलाल पहाडे, प्रकाशचंद बोथरा, सोभाचंद संचेती, मेजर सुभाषचंद संचेती, डॉ. अभिजीत अन्नदाते, डॉ. अजित बोरा, संतोष कासलीवाल, आनंद गंगवाल, उमेश संचेती, महावीर बाफना, नंदलाल मुगदिया, प्रकाश छाजेड, प्रफुल संचेती, राजेंद्र संचेती, गौतम संचेती, नितीन चुडीवाल, डॉ. संघवी, संकेत चुडीवाल, कांतीलाल कासलीवाल, शितल लोहाडे, महावीर ठोळे, प्रविण कोतकर, विक्रम अग्रवाल, निखिल लुणावत, पारस चुडिवाल सह शेकडो जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पोस्ट कार्ड च्या माध्यमातून देखील प्रधानमंत्री कार्यालय येथे पत्र पाठवत आपल्या भावना व्यक्त करण्यात आल्या असून पर्यटन स्थळाचा आदेश रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.



# ढगाळ वातावरणामुळे हरभरा, गहू, पिकांना मोठा फटका; किडीचा प्रादुर्भाव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा परिसरात मागील पाच ते सहा दिवसांपासून अनेक भागात ढगाळ वातावरण असल्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना फटका बसत आहे. त्यातच रोगराईमुळे औषध फवारणीचा खर्च वाढल्याने बळीराजाचा चिंता वाढली आहे.

थंडी गायब झाल्यामुळे गहू, हरभरा, रब्बीचा कांदा आदी पिकांवर रसशोषक किडी वाढल्याने शेतकरी वर्गाला चिंता भेडसावत आहे. परिसरातील रब्बीच्या पेरणी पुर्ण झाली असून कांदा व गहु पिकाचा पेरा मोठ्या प्रमाणात झाला आहे. भरपुर पाऊस झाल्याने थंडीचे प्रमाण जास्त राहील असा शेतकऱ्यांचा अंदाज होता मात्र चार पाच दिवसापासून थंडी गायब झाल्याने उगवलेल्या पिकांची वाढ खुंटली असून



रसशोषक किडीच्या विळख्यात सापडली आहेत. गेल्या पाच दिवसांपासून ढगाळ वातावरण आहे. या ढगाळ वातावरणामुळे रब्बीतील हरभरा व गहू या पिकांना फटका बसला आहे. त्यामुळे या पिकांची वाढ खुंटली असून, या पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे शेतकरी सध्या चिंतेत आलेले आहेत. तसेच, वाढलेल्या तुरीवर ही कीड निर्माण झाली असल्यामुळे शेतकरी अधिकच चिंतातूर झाले आहे.

त्यासोबतच पिकविमा ही शेतकऱ्यांनासुद्धा मिळाला नसल्यामुळे शेतकरी हतबल झालेले आहेत. तसेच, नुकसानभरपाई न मिळाल्यामुळे शेतकरी आर्थिक चिंतेत आहेत, असे असतानाही शेतकऱ्यांनी रब्बी हंगामामध्ये गहू व हरभरा हे पीक घेतले आहे. मात्र, गेल्या पाच दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणामुळे या पिकांवर किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झालेला आहे. त्यामुळे शेतकरी पिकांवर फवारणी करताना दिसत आहे. अनेक भागांमध्ये शेतकऱ्यांना या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे असे प्रगतीशील शेतकरी रामभाऊ वारगंणे यांनी बोलताना सांगितले.



# शाहू विद्यालयात गणित दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जायकवाडी (उत्तर) येथील शाहू विद्यालयात दिनांक २२ डिसेंबर हा राष्ट्रीय गणित दिन श्रीनिवास रामानुर्जन यांचा जन्मदिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी तथा जेष्ठशिक्षक अय्युब पठाण लोहगांवकर यांना महात्मा फुले यांच्या जीवनावर स्वरचित कविताचे प्रभावी काव्यगायन करून संगीतमय वातावरण निर्माण केले. त्यानंतर गणित दिवसाचे औचित्य साधून गणित शिक्षक संजय माळी आणि विद्यार्थीनी कु. आयेशा शेख यांनी गणिताविषयी मुला-मुलींना माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ शिक्षक अय्युब पठाण लोहगांवकर हे होते. याप्रसंगी जेष्ठ शिक्षक बळीराम वरखडे, संजय माळी, अशोक दिलवाले, सचिन .वाघमोडे, शिक्षिका श्रीमती आशा पाटील, सुनीता शिसोदे, कु. पल्लवी काळे, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी (ग्रंथपाल) बारीकराव ढोले, सुधीर नलावडे, विकास शेजूळ, वशीम शेख आणि विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कृषी विभागामार्फत मका पिकावरील लष्करी अळी नियंत्रणविषयी जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात मागील एक दोन वर्षात मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्या अनुषंगाने कृषी विभागामार्फत क्रॉपसॅप अंतर्गत हॉटस्पॉट व्हिलेज नांदगाव, किन्ही येथे तालुका कृषी अधिकारी एस. जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली मका पिकाच्या लागवडी पूर्वीच मका बियाण्यावरील बीजप्रक्रिया केल्याने होणारे फायदे, मका पिकाच्या वाढ अवस्थेनुसार खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन तसेच लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्यास इमामेक्टीन 8 ते 10 ग्रॅम प्रतिपंप याप्रमाणे फवारणी करावी, अशी माहिती कृषि सहाय्यक सतीश बोरसे यांनी दिली. तसेच शेतकऱ्यांना मका बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले. सदरील प्रात्यक्षिक कार्यक्रमास गावाचे सरपंच, उपसरपंच तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्माबादचा विष्णू जाधव दिल्लीला परेडसाठी जाणार

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथे बी.ए.तृतीय वर्षात शिकणारा राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक विष्णू विठ्ठल जाधव यांची २६ जानेवारी २०२२ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या पथसंचलनासाठी निवड झाली आहे. यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

ग्रामीण भागातून आपल्या गुणवत्तेच्या व कष्टाच्या बळावर मिळविलेल्या या यशाबद्दल महाराष्ट्र राज्याचे रा. से. यो. जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे,अहमदनगर येथील ETI प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. शरद बोरुडे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिह बिसेन, रासेयो संचालक डॉ. मल्लीकार्जून करजगी, धर्माबाद शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. कमलकिशोर काकाणी, सह-सचिव नागभूषण वर्णी, प्रभारी प्राचार्या डॉ.पी. सुशीला, उप-प्राचार्य डॉ.श्रीराम गव्हाणे, उप-प्राचार्या वसुंधरा वडवळकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. संभाजी मनूरकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. हणमंत कासराळीकर, महाविद्यालतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणात धर्माबाद येथील शिक्षकास अटक

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेत सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या नराधमाने दहावीत शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केल्या प्रकरणी त्याच्या विरोधात धर्माबाद पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे धर्माबाद तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

धर्माबाद शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेत कार्यरत असणाऱ्या सय्यद एजाज टेंभूर्णीकर या सहशिक्षकाने मंगळवारी (ता.२०) दहावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीच्या घरी कोणीच नाही,याची संधी साधतं घरी जाऊन अश्लील चाळे करून गैरवर्तन केले.ही बाब मुलींच्या नातेवाईकांच्या लक्षात येताच सबंधित वासनांध शिक्षकाविरुद्ध तक्रार नोंदविली. सदर घटनेची माहिती पोलिसांना कळताच घटनेचे गांभीर्य व तीव्रता लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपी विरुद्ध भा.दं.वि. कलम ३५४ (अ) व मुलगी अल्पवयीन असल्यामुळे पोक्सो अंतर्गत कलम ७,८ अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीला तात्काळ अटक केली. तसेच पंचायत समितीच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ (३) चा आधार घेत आरोपी विरुद्ध सेवेतून निलंबनाची कारवाई केली आहे.

सदर घटनेमुळे समाजिक सलोखा बिघडू नये यासाठी उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक संजय हिबारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रसाद कत्ते यांनी तात्काळ गुन्हा नोंदवून कोणीही, कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवण्याचे आव्हान केले आहे. सदर घटनेमुळे शिक्षकाच्या पेशाला काळिमा फासणारी घटना घडल्यामुळे जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.




# सिल्लोड येथे होणारा राज्यस्तरीय कृषी महोत्सव देशात गाजणार : संदीप मानकर

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून डोळ्याचे पारणे फेडणारा राज्यस्तरीय सिल्लोड कृषी महोत्सव-2023 यंदा सिल्लोड शहरात होत असून यांसाठी शासनस्तरांवर जंगी तयारी सुरु आहे. कृषी, कला व यांसोबतच क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून दि.01जानेवारी ते 10 जानेवारी भरगच्च कार्यक्रम घेतले जाणार आहे. या महोत्सवात देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी ऑनलाइन पद्धतीने हजेरी लावणार असून, राज्याचे लाडके मुख्यमंत्री नामदार एकनाथरावजी शिंदे व उपमुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस व संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संदीपान भुमरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्रथमच राज्यांतील मोठमोठी असणारे चारही कृषी विद्यापीठाची याठिकाणी विशेष उपस्थिती असणार आहे. महोत्सवात कृषी प्रदर्शनाचे एकूण 700 स्टॉल लागणार आहेत व सुमारे 2 लाखांच्या वर राज्यभरांतून नागरीक उपस्थित होणार असल्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे. याच अनुषंगाने कृषी महोत्सवाचे नियोजन कसे असावे, नागरिकांना कुठल्याही गोष्टीची कमतरता पडू नये यासंदर्भात सिल्लोड येथील सेना भवन येथे नामदार अब्दुल सत्तार साहेबांच्या कार्यालयाच्या प्रांगणावर झालेल्या आढावा बैठकीत शिवसैनिक तथा सामाजिक कार्यकर्ते व मंत्री अब्दुल सत्तार यांचे निकटवर्तीय असणारे संदीप मानकर यांनी कृषी महोत्सवाच्या माध्यमांतून सिल्लोड-सोयगांव मतदारसंघातून उपस्थित झालेले पदाधिकारी, कार्यकर्ते, बंधू आणि भगिनींना उपयुक्त मार्गदर्शन करतांना सांगितले की, सदरील साजरा होणारा कृषी महोत्सव सुवर्णमहोत्सव कशा पद्धतीने साजरा होईल व या महोत्सवाची नोंद देशाच्या पातळीवर कशी होईल यांवर प्रकाश टाकून सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपीठावर राज्याचे कर्तव्यदक्ष कृषिमंत्री नामदार अब्दुल सत्तार साहेब, माजी जि.प.अध्यक्ष श्रीराम महाजन, जि.प.उपाध्यक्ष केशवराव पा.तायडे, औरंगाबाद मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष तथा कृ.उ.बा.समितीचे सभापती अर्जुन पा.गाढे, उपनगराध्यक्ष तथा नॅशनल सूतगिरणीचे चेअरमन अब्दुल समीर, ज्येष्ठ नेते अशोक सूर्यवंशी, डॉ.मश्चिंद्र पाखरे, नॅशनल सूतगिरणी संचालक अब्दुल आमेर, जि.प.सदस्य दामू अण्णा गव्हाणे, दत्ता.पा. कुडके, मारोती पा.वराडे, नगराध्यक्षा राजश्री निकम, महिला आघाडीच्या दुर्गाताई पवार, मेघा शाह आदींसहित ज्येष्ठ नेतेगण व मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते, बंधू आणि भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in